फडणवीसच 'मफलरमॅन' : पवार

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दिवंगत नेते अजित पवार यांच्या विमान अपघातप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेत व्हीएसआर कंपनीचे मालक रोहित सिंग यांना वाचवण्याचा प्रयत्न राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करत असल्याचा गंभीर आरोप केला. फडणवीस आणि रोहित सिंग यांचा एकत्रित फोटो दाखवत 'मफलरमॅन' हे दुसरे कोणी नसून देवेंद्र फडणवीसच असल्याचा दावा रोहित पवार यांनी केला. या प्रकरणात काही चुकीचे घडले असल्यास सरकारने तपास करावा, असे आव्हानही त्यांनी दिले. यामुळे राजकीय वातावरणात खळबळ उडाली आहे.

१९३७-२०२६ ९० वर्ष

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग



रायगड | मंगळवार | दि. १७ नोव्हेंबर २०२६ | अंक १६१ | पृष्ठ ८ | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

Dr. N. Y. Tasgaonkar

रायगड हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटर

१० वर्षपूर्ण

रायगड हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटर

आरोग्य सेवेची दशक पुर्ती
अविरत सेवा आरोग्याची !





✻ उपलब्ध सुविधा ✻

- ओपीडी/आयपीडी
- 24 तास इमरजंसी विभाग
- ICU/ ICCU सेवा
- कान, नाक, घसा आणि नेत्र चिकित्सा विभाग
- शस्त्रक्रिया विभाग
- बालरोग व लहान मुलांचे आजार विभाग
- कार्डिओलॉजी विभाग
- ऑर्थोपेडिक सर्जरी विभाग
- रक्तपेढी - BLOOD BANK
- X - RAY, CT SCAN, MRI विभाग
- जनरल मेडिसिन विभाग

भिवपुरी रेल्वे स्टेशन समोर, कर्जत - कल्याण रोड, डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड, महाराष्ट्र 410201

संपर्क : 7058235753 / 7058238753 / 7756942946

लोकशाहीच्या रक्षणासाठी पुढाकार घ्या

■ काँग्रेसचे राजाभाऊ ठाकूर यांचे आवाहन


● (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

| आगरदांडा | प्रतिनिधी |

लोकशाही आणि संविधानाचे संरक्षण ही केवळ काँग्रेस किंवा राहुल गांधी यांची जबाबदारी नसून प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनीही लोकशाहीच्या रक्षणासाठी पुढाकार घ्यावा. तसेच, मत कोणाला द्यायचे? हा प्रत्येक मतदाराचा वैयक्तिक अधिकार असला, तरी प्रत्येक नागरिकाचा मतदानाचा अधिकार सुरक्षित राहणे आवश्यक आहे. तसेच, यावर्षी कमी पर्जन्यवृष्टी झाल्यामुळे मुरुड तालुक्यातील शेतकरी, बागायतदार आणि मच्छीमार मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे मुरुड तालुका दुष्काळग्रस्त घोषित करावा आणि नुकसानग्रस्तांना तातडीने योग्य नुकसानभरपाई आणि शासकीय आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ ठाकुर यांनी केली. राष्ट्रीय काँग्रेसच्या रायगड जिल्हा व मुरुड तालुका काँग्रेस कमिटीच्यावतीने सोमवारी (दि.१६) मुरुड शहरात निषेध मोर्चा काढण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

या मोर्चातून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणीही करण्यात आली. शहरातील आझाद चौक येथून तहसीलदार कार्यालयापर्यंत काढण्यात आलेल्या या मोर्चात रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ ठाकूर, कार्याध्यक्ष सुदेश वाणी, मुरुड तालुकाध्यक्ष प्रितम पाटील यांच्यासह कृष्णा अंबाजी, चिंतामणी मकु, सुरेंद्र मकु, सुधीर दांडेकर, संतोष बुल्लू, शबाब उलडे, किशोर कार्लेकर, शकील कडू, नगरसेविका सुगंधा मकु, सुमन पाटील, तालुका महिलाध्यक्ष मंजु घोले, इस्माईल घोले, इस्माईल शेख, उमेश भोईर, गणेश गाणार, नरेश बुल्लु, अब्दुल सलाम झोंबडकर, जयश्री बळी, रुपाली मकु, पूजा जठारी, सुमन रावजी यांच्यासह काँग्रेसचे महिला व पुरुष कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोर्चानंतर मुरूड तहसीलदार आणि जिल्हाधिकाऱ्यांसाठी नायब तहसीलदार संजय तवर यांच्योकडे विविध मागण्यांसंदर्भात दोन स्वतंत्र निवेदने देण्यात आली.

या मोर्चादरम्यान, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानामुळे प्रत्येक नागरिकाला समान अधिकार प्राप्त झाले आहेत. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य आणि मतदानाचा अधिकार हे लोकशाहीचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. मात्र, सध्या मतदान प्रक्रियेच्या निष्पक्षतेबाबत प्रश्न निर्माण होत असून, एसआयआर प्रक्रियेच्या नावाखाली अनेक पात्र मतदारांची नावे मतदार यादीतून वगळली जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे या प्रक्रियेची योग्य आणि पारदर्शक पडताळणी झाली पाहिजे. कोणत्याही पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतला जाऊ नये, अशी ठाम भूमिका जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ ठाकुर यांनी मांडली.

ते पुढे म्हणाले की, या मुद्द्यावर देशभरातील विरोधी पक्षांच्या आंदोलनाचे नेतृत्व राहुल गांधी करीत आहेत. दि.१ नोव्हेंबर रोजी दिल्लीतील रामलीला मैदानावर झालेल्या आंदोलनात सहभागी झालो होतो. लोकशाही आणि संविधानाचे संरक्षण ही केवळ काँग्रेस किंवा राहुल गांधी यांची जबाबदारी नसून प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनीही लोकशाहीच्या रक्षणासाठी पुढाकार घ्यावा. मत कोणाला द्यायचे हा प्रत्येक मतदाराचा वैयक्तिक अधिकार असला, तरी प्रत्येक नागरिकाचा मतदानाचा अधिकार सुरक्षित राहणे आवश्यक आहे. लोकशाही व्यवस्था आणि संविधानाचे संरक्षण करण्यासाठी काँग्रेस पक्षासोबतच सामान्य नागरिकांनीही या लढ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन राजाभाऊ ठाकूर यांनी केली.

तालुका दुष्काळग्रस्त घोषित करा

यंदा कमी पर्जन्यवृष्टी झाल्यामुळे मुरुड तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील शेतकरी, बागायतदार आणि मच्छीमार मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. पाण्याची टंचाई, शेतीचे नुकसान आणि घटलेले उत्पन्न यामुळे ग्रामीण भागातील परिस्थिती गंभीर झाली आहे. त्यामुळे मुरुड तालुका दुष्काळग्रस्त घोषित करावा. त्याचबरोबर नुकसानग्रस्तांना तातडीने योग्य नुकसानभरपाई आणि शासकीय आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी राजाभाऊ ठाकूर यांनी केली.


● (छायाचित्र : संजय गायकवाड)

पोलीस मित्र संघटनेचे उपोषण सुरू

| कर्जत | प्रतिनिधी |

टोरेंट जल विद्युत प्रकल्पातील बेकायदेशीर वृक्षतोड, जमीन संपादन व वनकायदा उल्लंघन प्रकरणी पोलीस मित्र संघटनेकडून लोकमान्य टिळक चौकात बेमुदत साखळी उपोषण सोमवार दि.१६ पासून सुरू करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी टोरेंट प्रकल्पाच्या उद्घाटनासाठी येत असल्याचे कारण पुढे करून कर्जत वन विभाग अधिकाऱ्यांनी एक खरी स्वाक्षरीचे व दुसरे बनावट स्वाक्षरीचे अशी दोन पत्रे प्रसिद्ध करून जनतेची दिशाभूल करून मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली. दोन्ही पत्रांची चौकशी करून बनावट पत्र प्रसिद्ध केल्याप्रकरणी संबंधित वन विभाग अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्यात यावी. आदिवासी खातेदारांचा टोरंट प्रकल्पाला दळी जमीन देण्यास स्पष्ट विरोध असल्याचा ग्रामसभा ठराव मंजूर असताना, त्या ठरावाची प्रत जोडून जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, पोलीस अधीक्षक, उपवनसंरक्षक यांना पत्रव्यवहार करण्यात आला होता. तरीही ठरावाला केराची टोपली दाखवून जमीन संपादन करून पेसा, वनहक्क आणि भूसंपादन कायद्याचा भंग करण्यात आला. त्यामुळे ग्रामसभा ठरावाविरोधात केलेले संपादन तात्काळ रद्द करून संबंधित अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी. यासह इतर मांगण्यांसाठी उपोषण करण्यात आले आहे.

ई-रिक्षा वाढीसाठी मुख्यमंत्र्यांना आवाहन

| माथेरान | प्रतिनिधी |

माथेरानमध्ये ई-रिक्षा सुरू होऊन दोन वर्षे उलटून गेली. तरीसुद्धा ई-रिक्षांच्या संख्येत वाढ करण्यात आलेली नाही. सध्या एकूण ९४ हातरीक्षा परवानाधारक असून, फक्त २० जणांनाच या ई-रिक्षा स्वखर्चाने खरेदी करता आल्या आहेत. त्यामुळे ऐन सुट्ट्यांच्या हंगामात या ई-रिक्षा कमी पडतात. त्यामुळे उर्वरित ७४ परवानाधारक हातरीक्षा चालकांना ई-रिक्षा मिळाव्यात यासाठी संघटनेचे सदस्य शर्थीचे प्रयत्न करत आहेत.लोकप्रतिनिधींसह अन्य नेतेमंडळींकडे पाठपुरावा करूनही



अद्याप ई-रिक्षाच्या संख्येत वाढ झालेली नाही. सुप्रीम कोर्टाने माथेरानमधील हातरीक्षा चालकांना सन्मानाचे जीवन जगण्यासाठी पर्याय म्हणून ई-रिक्षा सुरू करण्यासाठी सनियंत्रण समितीला आदेश दिले होते. परंतु, ही समिती सुद्धा आपले कर्तव्य पार पाडू शकलेली नाही. उर्वरित ७४ हातरीक्षा चालक स्वखर्चाने ई-रिक्षा खरेदी करण्यासाठी सज्ज आहेत; परंतु, येथील नगरपालिका प्रशासन सुद्धा मूग गिळून गप्प बसले आहेत. सुप्रीम कोर्टाचे आदेश असतानाही सनियंत्रण समिती आदेशाचे पालन करत नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. दरम्यान, राज्यातील एक रमणीय पर्यटनस्थळ म्हणून माथेरान जगप्रसिद्ध आहे. येथील स्थानिक भूमिपुत्रांना कायमस्वरूपी रोजगाराचे साधन हे पर्यटन वाढीमुळेच शक्य आहे. त्यासाठी मुख्यमंत्री महोदयांनी प्रयत्न करावेत, अशी संघटनेच्या सदस्यांकडून आर्त साद घातली जात आहे.

३४ वर्षीय महिला बेपत्ता

| पनवेल | प्रतिनिधी |



पनवेल तालुक्यातील वाजे येथील ३४ वर्षीय सोनाली कातकरी या महिला बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. बेपत्ता सोनाली कातकरी यांचा रंग काळा-सावळा, बांधा मजबूत, उंची सुमारे पाच फूट, केस व डोळे काळे असून चेहरा उभट आहे. बेपत्ता होताना त्यांनी साडी परिधान केली होती. त्या मराठी भाषा बोलतात.

पनवेल, कळंबोलीसह ३६ तास पाणीबाणी

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (एमजेपी) वतीने वायाळ येथील जलवाहिनीच्या तातडीच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामामुळे पनवेल, कळंबोली, करंजाडे आणि काळुंद्रे नोडमधील पाणीपुरवठा तब्बल ३६ तास बंद राहणार आहे. सिडको प्रशासनाने याबाबत अधिकृत सूचना प्रसिद्ध केली असून, या कालावधीत नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.

एमजेपीकडून मिळालेल्या माहितीनुसार, वायाळ येथील जलवाहिनीच्या आपत्कालीन दुरुस्तीचे काम मंगळवारी (दि.१७) सकाळी ९ वाजता सुरू होणार आहे. हे काम बुधवारी (दि.१८) रात्री ९ वाजेपर्यंत चालणार आहे. त्यामुळे या संपूर्ण ३६ तासांच्या कालावधीत संबंधित चार नोडमधील पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार आहे. विशेष म्हणजे, दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतरही पाणीपुरवठा लगेच पूर्ववत होण्याची शक्यता नसून, गुरूवारी (दि.१९) काही भागांत कमी दाबाने पाणीपुरवठा होणार असल्याचे सिडकोने स्पष्ट केले आहे. त्यामुळे नागरिकांना पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागू शकते. या पाणीबंदीचा सर्वाधिक परिणाम गृहसंकुले, सोसायट्या, झोपडपट्टी परिसर, व्यावसायिक आस्थापना, हॉटेल्स तसेच दैनंदिन पाण्यावर अवलंबून असलेल्या नागरिकांवर होण्याची शक्यता आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्ण असलेल्या कुटुंबांना पाण्याचे नियोजन करावे लागणार आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिल श्री. केतन जगदिश भोईर, रा. घर नं. ४२ बी, मु. पो. कुंडेवहाळ, मराठी शाळे जवळ, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे अंत्राट तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.

स.नं./हि.नं.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू.पै.)	भोगवटाधारकाचे नाव
७/१	०.०८.०० पो.ख. ०.०५.००	०.०५	श्री. चंद्रकांत मोरेश्वर जाधव, श्री. भगवान मोरेश्वर जाधव, श्री. रमेश मोरेश्वर जाधव, श्री. रविंद्र मोरेश्वर जाधव व श्री. विकास मोरेश्वर जाधव.
	एकुण ०.१३.००		

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ०७ (सात) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १७/११/२०२६.

सही /-
ॲड. उषा जे. कांबळे.
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६.



पनवेलमध्ये दुर्गंधीयुक्त पाण्याचे साम्राज्य

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

पनवेल शहरातील गजबजलेल्या लाइन आळी परिसरात रस्त्यावरून सतत दुर्गंधीयुक्त पाणी वाहत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. रस्त्यावर साचणारे आणि वाहणारे सांडपाणी यामुळे परिसरात अस्वच्छतेचे वातावरण निर्माण झाले असून, ये-जा करणाऱ्या नागरिकांसह वाहनचालकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे हा प्रकार वारंवार घडत असल्याने स्थानिक रहिवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

लाइन आळी हा पनवेल शहरातील वर्दळीचा परिसर आहे. या भागात नागरिकांची सतत ये-जा सुरू असते. दुकाने, व्यावसायिक आस्थापना आणि निवासी इमारती असल्याने दिवसभर नागरिकांची वर्दळ असते. मात्र, रस्त्यावरून वाहणाऱ्या दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे परिसरातून चालणेही कठीण झाले आहे. पादचाऱ्यांना सांडपाण्यातून वाट काढावी लागत असून, दुचाकी आणि चारचाकी वाहनांच्या ये-जा करताना हे पाणी उडून नागरिकांच्या अंगावर पडत आहे. सांडपाण्याच्या दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिक आणि दुकानदार त्रस्त झाले आहेत. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना या परिस्थितीचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती होण्याची भीतीही नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

महापालिकेच्या हद्दवाढीला स्थानिकांचा विरोध

| उरण | प्रतिनिधी |

पनवेल महापालिकेच्या हद्दवाढीच्या प्रस्तावाला आता गव्हाण आणि वडघर परिसरातून विरोधाचा आवाज उठू लागला आहे. या दोन जिल्हा परिषद गटांचा महापालिका क्षेत्रात समावेश करण्याचा ठराव विशेष महासभेत मंजूर करण्यात आला असला, तरी या निर्णयाविरोधात स्थानिक पातळीवर असंतोष व्यक्त होत आहे. या विरोधात येत्या १८ नोव्हेंबर रोजी महापालिका मुख्यालयासमोर गेट बंद आंदोलन करण्यात येणार आहे. याबाबत अजित म्हात्रे यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन देत आंदोलनाचा इशारा दिला आहे.

पनवेल महापालिकेच्या हद्दवाढीच्या प्रस्तावामुळे ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींचे स्वतंत्र अस्तित्व आणि स्वायत्तता धोक्यात येण्याची शक्यता असल्याचा आक्षेप महामात्रे यांनी घेतला आहे. गावांचा विकास व्हावा, याबाबत दुमत नाही; मात्र, विकासाच्या नावाखाली स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारच हिरावून घेतले जाणार असतील, तर हा निर्णय ग्रामीण जनतेवर अन्याय करणारा ठरेल, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. ग्रामपंचायतींना स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकार कायम राहिले पाहिजेत. गावांच्या विकासाचे निर्णय घेण्याचा अधिकार स्थानिक ग्रामस्थांकडेच असला पाहिजे. महापालिकेच्या हद्दीत समावेश करून ग्रामीण भागाची स्वतंत्र ओळख आणि प्रशासकीय स्वायत्तता संपवू नये, अशी मागणी करण्यात येत आहे. या हद्दवाढीच्या प्रस्तावाविरोधात आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री, कोकण विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन, पनवेल तहसीलदार आणि पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन पाठविण्यात आले आहे.

जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत सुशील किसनचंदर काकु रा. डॉ. सी. जी. रोड, गोल्फ क्लब, आर. सी.एफ. कॉलनी समोर, चेंबुर, एफ.सी.आय. मुंबई ४०००७४ यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

मौजे -बिरदोले, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र	आकार रुपये-पैसे
२	१३ ब	०-११-०० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-१२-००	०-११

वरील शेतजमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण, दान, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलांच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सूचना आहे.

दिनांक : १६ नोव्हेंबर २०२६

ॲडव्होकेट प्रवीण पुंडलिक कराळे
पत्ता : ओमकार अपार्टमेंट, डिकसळ,
पो.कोषाणे, ता.कर्जत, जि.रायगड
९९७५०९०३०४/९६०७५५६३१५

उन्हात ताटकळत राहण्याची नामुष्की

| नागोठणे | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा महामार्गावरील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या नागोठण्यातील हायवे नाका हा प्रवासासाठी अंत्यत महत्त्वाचा नाका समजला जातो. कोकणात जाणाऱ्या सर्व लांब पल्ल्याच्या एस.टी. गाड्या तसेच कोकणातून मुंबईकडे जाणाऱ्या गाड्या नागोठण्यातील याच हायवे नाक्यावर थांबतात. परंतु, महामार्गाचे काम सुरु झाल्यापासून या हायवे नाक्यावर प्रवासी शेड नसल्याने एसटीची वाट पाहणाऱ्या प्रवाशांना उन्हात ताटकळत राहण्याची नामुष्की ओढावली आहे.

राज्य परिवहन महामंडळाचे मध्यवर्ती


● (छायाचित्र : महेश पवार)

स्थानक असलेल्या नागोठणे बस स्थानकात पनवेल, मुंबई तसेच माणगाव, महाडकडे जाणाऱ्या गाड्यांची संख्या मर्यादित आहे. त्यातील अनेक एस.टी. बसेस नागोठण्यातील हायवे नाका येथे थांबतात. त्यामुळे नोकरीनिमित्त नागोठण्यातून ये-जा करणारे कर्मचारी, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच इतर प्रवाशांना हायवे नाक्याचा खूप मोठा आधार मिळतो. मात्र, महामार्गाचे काम सुरु झाल्यापासून याठिकाणी प्रवासी शेड नसल्यामुळे दोन्ही बाजूकडील प्रवाशांना उन्हात ताटकळत राहून एसटीची वाट पाहावी लागते. त्यामुळे प्रवासी वर्गातुन नाराजीचे सुर उमटत असून, नागोठण्यातील हायवे नाक्यावर महामार्गाच्या दोन्ही बाजूला लवकरात लवकर प्रवासी शेड उभारण्यात याव्यात, अशी मागणी त्यांच्याकडून होत आहे.

रेवदंडा महावितरणचा ग्राहकांना शॉक

| रेवदंडा | विशेष प्रतिनिधी |

वीज ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा करण्याची जबाबदारी असलेल्या महावितरणकडूनच आता ग्राहकांच्या खिशाला कात्री लावली जात असल्याचा गंभीर आरोप रेवदंडा परिसरातील वीज ग्राहकांकडून होत आहे. गेल्या पाच महिन्यांपासून प्रत्यक्ष मीटर रीडिंग न घेता सरासरी वीजबिलांच्या नावाखाली ग्राहकांना बिले पाठविली जात असल्याने नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. एका बाजूला वाढत्या वीजबिलांचा आर्थिक भार आणि दुसऱ्या बाजूला स्मार्ट मीटर बसविण्याबाबत निर्माण झालेला संभ्रम, अशा दुहेरी संकटात सामान्य ग्राहक सापडला आहे.

वीज ग्राहक दर महिन्याला आपल्या कष्टाच्या कमाईतून वीजबिल भरत असताना महावितरणने मात्र ग्राहकांना विश्वासात घेऊन पारदर्शक कारभार करणे अपेक्षित आहे. परंतु, सरासरी बिलांच्या नावाखाली सलग पाच महिने ग्राहकांकडून रक्कम आकारली जात असेल, तर त्याचा आधार



■ सरासरी बिलांच्या नावाखाली लूट

काय? प्रत्यक्ष मीटर रीडिंग का घेतले जात नाही? ग्राहकांनी भरलेल्या रकमेचा नेमका हिशेब कुठे आहे? प्रत्यक्ष वीज वापरापेक्षा जास्त रक्कम आकारली गेली असेल तर ती ग्राहकांना परत मिळणार की पुढील बिलात समायोजित होणार? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. स्मार्ट मीटर आणि प्रीपेड पद्धत या दोन बाबींमधील फरकही महावितरणने स्पष्ट करणे आवश्यक असल्याचे वीज ग्राहकांमधून बोलले जात आहे.

दर महिन्याला वीजबिल वेळेवर भरतो, तरीही सरासरी बिलांच्या नावाखाली किती पैसे वसूल केले जातात, याचा हिशेबच मिळत नाही. प्रत्यक्ष किती वीज वापरली याची माहिती न देता हजारो रुपयांची बिले पाठवली जातात. सामान्य माणसाने वीजबिल भरायचे की घरखर्च चालवायचा? महावितरणने आधी आमच्या बिलांचा हिशेब द्यावा, चुकीची आकारणी झाली असेल तर ती दुरुस्त करावी आणि स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांवर कोणतीही सक्ती करू नये.

- निलेश खोत,
सामाजिक कार्यकर्ते



चारफाटा येथे ठाकरे गटाचे आंदोलन

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत-चारफाटा येथील रेल्वे पूल आणि परिसरातील राज्यमार्ग रस्त्यावर खड्डे पडल्याने प्रवास करताना त्रास होतो. या रस्त्यावर अपघात होऊन अनेक जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. तर, काहींना आपले अवयव गमवावे लागले आहेत. त्यामुळे ठाकरे गटाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी चारफाटा येथे खड्ड्यात बसून आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. मात्र, रविवारी (दि.१५) रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी संपर्क करून रस्त्यावरील खड्डे भरण्यात येतील, असे सांगितले. त्यामुळे ठाकरे गटाच्य प्रमुख पदाधिकाऱ्यांनी सोमवारी (दि.१६) सकाळी चारफाटा येथे उपस्थित राहून खड्डे चांगल्या प्रकारे भरण्याच्या सूचना केल्या. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, तालुका प्रमुख बजरंग दळवी, माधव कोळंबे, माजी सभापती प्रदीप ठाकरे, उपसभापती चित्रा ठाकरे, पंचायत समिती सदस्य नमिता श्रीखंडे, नगरसेविका सुचिता खोत, माजी सरपंच प्रमिला बोराडे आदी उपस्थित होते. त्यांनी थोडावेळ आंदोलन केले. त्यानंतर रस्ते विकास महामंडळ पेण येथील शाखा अभियंता राहुल विशे यांनी खड्डे व साईड पट्ट्या भरण्यास मंगळवार दि.१७ नोव्हेंबरपासून सुरुवात करण्यात येईल, असे पत्र दिले. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

ग्रुप ग्रामपंचायत कडापे
ता. माणगाव, जि. रायगड

जाहीर निविदा नोटिस बोर्ड प्रसिद्धी दिनांक-१३/११/२०२६

ग्रुप ग्रामपंचायत कडापे ता. माणगाव जि. रायगड यांस कडून खालील कामाकरिता जास्त नोंदणीकृत, इच्छित ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तसेच सदरचे निविदा व दरपत्रक दि.२३/११/२०२६ पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय कडापे येथे सकाळी १०.०० वाजे पर्यंत सादर करावे.

अ. क्र	कामाचे नाव	योजनेचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	काम पूर्ण करावयाचा कालावधी
१	१५% मागासवर्गीय खर्चातून वैयक्तिक बाबी खरेदी करणे	स्व.निधी	१४११९८/-	६ महीने
२	शाळा व अंगणवाड्यांना स्वच्छता विषयक साहित्य पुरविणे	१५ वा वित्त आयोग	५८८५६/-	६ महीने

अटी व शर्ती -:
१. प्राप्त निविदा दि. रोजी २३/११/२०२६ स. ११.३० वाजता ग्रा.पं. कडापे येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडणेत येतील.
२. निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती /चलन जोडलेली असावी.
३. कोणतेही कारण न देता एक किवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
४. कामाच्या अंदाज पत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील.
५. निविदा मंजुरी अंती ठेकेदार/पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून घ्यावा लागेल.
६. कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे काम पूर्ण करणे बंधनकारक राहील, अन्यथा नियमानुसार दंड व ज्ञाप्ती लागू करण्यात येयील.
७. साहित्य व वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली आहे.
८. निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.
९. नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल.
१०. ठेकेदार/पुरवठा दार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व प्रणालीशी सलग्न असावे.
११. कायद्याच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल.

सही/-
नम्रता नरेश तरडे
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत कडापे
ता.माणगांव जि.रायगड

सही/-
अस्मिता जनार्दन सिलीमकर
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत कडापे
ता.माणगांव जि.रायगड

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | मंगळवार । दि. १७ नोव्हेंबर २०२६ । अंक १६१ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

450 आदिवासींच्या जमिनीवर डल्ला

बॉक्साईड उत्खननाविरोधात महालमिऱ्यात संताप

उत्खनन तात्काळ बंद करा, अन्यथा आंदोलनाचा इशारा

। पेण । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील महालमिऱ्या डोंगराळ परिसरात सुरू असलेल्या बॉक्साइट उत्खननाविरोधात स्थानिक आदिवासी बांधवांचा संताप उफाळून आला आहे. सुमारे ४५० आदिवासी कुटुंबांच्या जमिनींवर उत्खनन सुरू असून, या उत्खननामुळे त्यांच्या जमिनींचे अस्तित्वच धोक्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. एका सोसायटीच्या माध्यमातून सुरू असलेल्या या उत्खननाला विरोध करत आदिवासी बांधवांनी एकजूट दाखवली असून, उत्खनन तात्काळ बंद करण्याची आक्रमक मागणी केली आहे. जमिनींचे नुकसान होत असताना प्रशासन गप्प का? असा सवालही आता उपस्थित केला जात आहे.



महालमिऱ्या डोंगर परिसराच्या पायथ्याशी आदिवासी समाजाची सुमारे ४५० घरे असून, त्यांच्या मालकीची अंदाजे १२० एकर जमीन या परिसरात आहे. गेल्या काही वर्षांपासून एका सोसायटीच्या माध्यमातून या जमिनींवर बॉक्साइट उत्खनन सुरू असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. आपल्या मालकीच्या जमिनींवर उत्खनन सुरू असताना स्थानिक आदिवासी बांधवांच्या हिताचा विचार केला जात नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित सोसायटीने खोट्या कागदपत्रांच्या आधारे •➤पान ५ वर

सखोल चौकशी करा!

बॉक्साइट उत्खनन अधिकृत असल्याचा सोसायटीचा दावा, तर खोट्या कागदपत्रांच्या आधारे जमिनी बळकावल्याचा आदिवासींचा आरोप आहे. त्यामुळे जमिनींचे मालकी हक्क, भाडेकरार आणि उत्खननाच्या परवानग्यांची प्रशासनाने सखोल चौकशी करावी. २०२८ पर्यंत भाडेकरार असल्याचे सांगितले जात असले, तरी तोपर्यंत आदिवासींच्या जमिनींचे नुकसान होऊ नये, अशी स्थानिकांची मागणी आहे.

फुग्याने घेतला चिमुकल्याचा जीव



। चौल । प्रतिनिधी ।

पोटच्या गोळ्याचा श्वास अडकल्याचे पाहून आईच्या काळजाचा ठोका चुकला... मुलाचा जीव वाचविण्यासाठी तिने आटोकाट प्रयत्न केले. कधी त्याला खांद्यावर घेत धावली, तर कधी रस्त्यात दिसेल त्या वाहनाला हात करून मदतीची याचना केली. मात्र, बेलकडे ते कुरुळदरम्यानच्या जीवघेण्या वाहतूक कोंडीत तिची धडपड अडकली. अखेर जिल्हा रुग्णालयात पोहोचताच डॉक्टरांनी दोन वर्षांच्या आरांश सुशील ठाकूर याला मृत घोषित केले. अलिबाग तालुक्यातील बामणगाव-खारीकपाडा येथे सोमवारी दुपारी घडलेल्या या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसर सुन्न झाला आहे.

दुपारी दोनच्या सुमारास आरांश घरी फुग्याबरोबर खेळत होता. खेळता खेळता त्याने अचानक फुगा गिळला आणि त्याचा श्वास अडकू लागला. ही बाब लक्षात येताच आई-वडिलांनी फुगा बाहेर काढण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यांना यश आले नाही. क्षणाचाही विलंब न करता त्यांनी आरांशला जिल्हा रुग्णालयात नेण्याचा निर्णय घेतला. पण, त्यांच्यासमोर उभी होती ती बेलकडे ते कुरुळदरम्यानची प्रचंड वाहतूक कोंडी!

- **आईची धडपड ठरली व्यर्थ**
- **दोन वर्षांच्या आरांशचा दुर्दैवी मृत्यू**
- **वाहतूक कोंडीमुळे वेळेत उपचार मिळण्यास उशीर**

> दिवाळीच्या सुट्ट्या संपल्यानंतरच काम सुरू करावे, अशा सक्त सूचना ठेकेदाराला देण्यात आल्या होत्या. परंतु, त्याआधीच ठेकेदाराने काम सुरू केल्याने सर्व गोंधळ उडाला आहे. वाहतूक पोलीस अधिकारी व कर्मचारी दिवस-रात्र वाहतूक सुरळीत करण्यासाठी कार्यरत आहेत. उद्यापासून पर्यायी मार्गांनी वाहतूक वळवून वाहतुकीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न असेल. - सचिन पवार, पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक नियंत्रण

रस्त्याच्या कामामुळे आधीच वाहने अडकून पडली होती. पुढे जाण्याचा मार्गच मिळत नव्हता. इकडे आरांशचा श्वास कोंडत होता आणि तिकडे वाहतूक मात्र जागची हलत नव्हती. •➤पान ५ वर

मृतदेह घरी नेतानाही कोंडीचा अडथळा

या घटनेनंतरही वाहतूक कोंडीने कुटुंबियांची पाठ सोडली नाही. चिमुकल्या आरांशचा मृतदेह घरी नेतानाही कोंडीत अडकावे लागले. त्यासाठी तब्बल दोन तासांहून अधिक वेळ लागल्याने ग्रामस्थांचा संताप अनावर झाला आहे. रस्त्याच्या कामामुळे निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीने वेळेवर उपचार मिळण्यात अडथळा निर्माण झाल्याचा आरोप करत संबंधित ठेकेदारांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

जिल्हाधिकारी साहेब, आतातरी लक्ष द्या!

एका निष्पाप चिमुकल्याचा जीव गेल्यानंतर तरी जिल्हा प्रशासन जागे होणार का? ठेकेदाराची मनमानी आणि जिल्हा प्रशासनाचा वचक नसल्याने आज चिमुकल्याला जीव गमवावा लागला. एका आईची मुलाला वाचविण्यासाठीची आर्त धडपड आणि अखेर पदरी आलेले दुःख यामुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

वे|ध|क

सीईटीचे संभाव्य वेळापत्रक जाहीर

मुंबई : शैक्षणिक वर्ष २०२७-२८ साठी पदवी आणि पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने जाहीर केले आहे. २८ जानेवारी ते १० जून २०२७ या कालावधीत एकूण २१ सीईटी परीक्षा होणार आहेत. यापैकी ११ अभ्यासक्रमांसाठी दोन वेळा परीक्षा घेण्यात येणार असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

कारच्या धडकेत स्कूटीस्वाराचा मृत्यू

नागोठणे : भरधाव वेगाने जाणाऱ्या कारचालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने कारची स्कुटीच्या मागील बाजूस धडक बसून झालेल्या अपघातात स्कुटी चालक मच्छिंद्र भिकाजी घासे (३६) रा. नांगराचा माळ, तरशेत, ता. पेण याचा एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. हा अपघात पेझारी-नागोठणे मार्गावरील रिलायन्स कंपनीच्या मार्केटिंग बिल्डिंगसमोरील रस्त्यावर रविवारी (दि.१५) रात्री सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास घडला. यासंदर्भात नागोठणे पोलीस ठाण्यातून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार, कारचालक अमित राजकुमार सिंग, रा. गांधी चौक नागोठणे, मूळ रा. सेक्टर ३, •➤पान ५ वर

माणगावमध्ये काळाचा घाला



- **स्लॅब कोसळून दोघांचा मृत्यू**
- **जुन्या घराच्या दुरुस्तीवेळी भीषण दुर्घटना**

। माणगाव । प्रतिनिधी ।


माणगाव तालुक्यात जुन्या घराच्या दुरुस्तीचे काम दोन कामगारांच्या जीवावर बेतले आहे. घरोशीवाडी येथे दुरुस्तीचे काम सुरू असताना घराचा स्लॅब अचानक कोसळून दोन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला. सोमवारी (दि. १६) दुपारी घडलेल्या या भीषण दुर्घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून, मृत कामगारांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, घरोशीवाडी येथे एका जुन्या घराच्या दुरुस्तीचे काम सुरू होते. यावेळी दोन कामगार घराच्या दुरुस्तीचे काम करीत असताना अचानक स्लॅब कोसळला. क्षणार्धात घडलेल्या या दुर्घटनेत दोन्ही कामगार स्लॅबच्या ढिगाऱ्याखाली अडकले. अचानक झालेल्या या दुर्घटनेमुळे घटनास्थळी एकच गोंधळ उडाला.

या दुर्घटनेत दीपक बाजीराव जाधव आणि सचिन बाळाराम कोळी या दोन कामगारांचा मृत्यू झाला. दोघांचेही मृतदेह माणगाव उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी आणण्यात आले. या घटनेमुळे घरोशीवाडी परिसरात शोककळा पसरली आहे.

प्लॅटिनम गोदामात आगीचे तांडव

- **केमिकलच्या साठ्याचे स्फोट**
- **उरणकरांच्या जीवाशी खेळ**



। चिरनेर/उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील वेश्वी गावाजवळील प्लॅटिनम लॉजिस्टिक गोदामाला सोमवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास भीषण आग लागून परिसरात एकच हाहाकार उडाला. गोदामात ज्वलनशील केमिकलचा साठा असल्याची चर्चा असून, आगीदरम्यान एकापाठोपाठ एक स्फोट झाल्याने परिसर हादरून गेला. आगीच्या भल्या मोठ्या ज्वाळा आणि काळ्याकुट्ट धुराचे लोट आकाशात पसरल्याने परिसरातील नागरिक भयभीत झाले. धुरामुळे काही रहिवाशांना श्वास घेण्यास त्रास होत असल्याचेही समोर आले आहे. गोदामातील केमिकलचा साठा खरोखरच किती धोकादायक होता, याचा आता पर्दाफाश होणे गरजेचे आहे.

सिडको आणि पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून, आग आटोक्यात आणण्यासाठी जवानांची धावपळ सुरू आहे. उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांनी घटनास्थळी भेट देऊन नागरिकांना सुरक्षितस्थळी जाण्याच्या सूचना दिल्या. मात्र, आग लागल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा आग लागूच नये यासाठी सुरक्षा यंत्रणा काय करत होती, हा खरा सवाल आहे.

विशेष म्हणजे, याच गोदामाला यापूर्वीही भीषण आग लागल्याची माहिती समोर येत आहे. मग मागील आगीच्या घटनेनंतर •➤पान ५ वर

चक्रव्यूह भेदून बाहेर पडणारा मी योद्धा

खा. सुनील तटकरेंचा सूचक इशारा



। अलिबाग । प्रतिनिधी ।

माझ्याविरोधात कितीही राजकीय चक्रव्यूह रचले, कितीही कटकारस्थाने केली तरी त्यातून बाहेर पडण्याची ताकद माझ्यात आहे. महाभारतात अभिमन्यू चक्रव्यूहात अडकला होता; मात्र मी चक्रव्यूह भेदून बाहेर पडणारा योद्धा आहे. महायुतीच्या आम दारांविरोधात काम केल्याचा एक तरी ठोस पुरावा द्या. विरोधकांची टीका मी एन्जॉय करतो; मात्र रायगडच्या विकासाचा ध्यास कोणत्याही •➤पान ५ वर

दिव्यांगांसाठीच्या सायकली धूळखात



- **सायकलींची दुरवस्था झाल्याचा सुरेश खरात यांचा आरोप**
- **आयुक्तांकडे चौकशी आणि दोषींवर कारवाईची मागणी**

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

दिव्यांग बांधवांना स्वावलंबी बनविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत खरेदी करण्यात आलेल्या सायकली आणि व्हीलचेअरच्या वापराबाबत आता प्रश्न उपस्थित झाले आहेत. लाखो रुपये खर्च करून खरेदी केलेल्या सायकली गरजू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याऐवजी एका ठिकाणी धूळखात आणि गंजलेल्या अवस्थेत पडून असल्याचा आरोप पनवेलमधील सुरेश खरात यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून जनतेच्या पैशाच्या खर्चाचा हिशेब जाहीर करण्याची मागणी त्यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिव्यांगांसाठी सायकली आणि व्हीलचेअर खरेदी केल्याचे खरात यांनी निवेदनात म्हटले आहे. मात्र, या साहित्याचे प्रत्यक्षात किती लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले, किती साहित्य शिल्लक आहे आणि त्याची सध्याची अवस्था काय आहे, याबाबत पारदर्शक माहिती उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

खरात यांनी निवेदनासोबत काही छायाचित्रे जोडली असून, त्यामध्ये सायकली धूळ खात, गंजलेल्या आणि तुटलेल्या अवस्थेत पडून असल्याचे दिसत असल्याचा दावा केला आहे. दिव्यांगांसाठी खर्च करण्यात आलेला निधी योग्य कारणासाठी वापरला गेला का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

या सायकलींची खरेदी कोणत्या वर्षी •➤पान ५ वर

लातूर जिल्हा बँकेवर काँग्रेसची जोरदार मुसंडी

। लातूर । प्रतिनिधी ।

मतदारांची पळवापळवी आणि गुन्हे दाखल करण्यापर्यंत पोहोचलेल्या तीव्र संघर्षाच्या पार्श्वभूमीवर लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक पार पडली. सोमवारी जाहीर झालेल्या निकालानुसार, माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या नेतृत्वाखालील 'सहकार पॅनल'ने १९ पैकी १४ जागा जिंकून बँकेवर पुन्हा एकदा निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे. दुसरीकडे, विरोधकांच्या 'राजे छत्रपती शिवाजी महाराज परिवर्तन पॅनल'ने पाच जागांवर विजय मिळवत बँकेत चंचूप्रवेश केला आहे.

लातूर जिल्ह्याच्या अर्थकारणात अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या जिल्हा बँकेच्या १५ जागांसाठी १५ नोव्हेंबर रोजी मतदान झाले होते. एकूण ९९९ मतदारांपैकी ९९३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

सोमवारी सकाळी नऊ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांच्या नेतृत्वाखाली मतमोजणी झाली. १५ जागांसाठी २९ उमेदवार रिंगणात होते. या निवडणुकीत सहकार पॅनलने बाजी मारली असली, तरी अरविंद पाटील निलंगेकर आणि ऋषिकेश कराड यांच्या रूपाने विरोधकांनी बँकेत प्रवेश मिळवला आहे.


हिरव्यागार झावळ्या सुकू लागल्याने बागायतदार धास्तावले | फवारणीचा खर्च आवाक्याबाहेर, शासनाकडे मदतीची मागणी

सुपारीच्या बागांवर करप्याचा घाला

संतोष राऊळ

। अलिबाग ।

रायगडच्या किनारपट्टीवरील सुपारीच्या बागांवर करपा रोगाचे संकट घोंघावत असून, हिरवीगार झावळ्या अचानक सुकू लागल्याने बागायतदार धास्तावले आहेत. आक्षी, नागावपासून मुरूड आणि श्रीवर्धनपर्यंत अनेक भागांत सुपारीच्या झाडांवर रोगाचा प्रादुर्भाव दिसत आहे. सात ते दहा वर्षे जपून वाढवलेली झाडेच धोक्यात आल्याने बागायतदारांसमोर उत्पन्नाचे संकट उभे राहिले आहे. रोग नियंत्रणासाठी फवारणी आवश्यक असली, तरी कीटकनाशके आणि ड्रोन फवारणीचा खर्च परवडत •➤पान ५ वर





शासनाने पुढाकार घेण्याची गरज

सुपारीची झाडे उंच वाढत असल्याने शेकडो झाडांच्या सुईपर्यंत फवारणी करणे प्रत्येक बागायतदाराला शक्य नाही. तज्ज्ञांनी ड्रोनच्या सहाय्याने फवारणीचा पर्याय सुचवला असला, तरी त्यासाठी लागणारा खर्च आणि कीटकनाशकांची किंमत सामान्य बागायतदारांच्या आवाक्याबाहेर आहे. त्यामुळे रोग नियंत्रणासाठी शासनाने सामूहिक फवारणीची व्यवस्था करावी, आवश्यक कीटकनाशके उपलब्ध करून द्यावीत आणि नुकसानग्रस्त बागायतदारांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे. वेळीच उपाययोजना न झाल्यास वर्षानुवर्षे जपलेल्या सुपारीच्या बागा उद्ध्वस्त होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

> सध्या करपा रोगामुळे सुपारी बागायतदार मोठ्या चिंतेत आहेत. आक्षी आणि परिसरातील अनेक कुटुंबांचे संपूर्ण उत्पन्न सुपारीवर अवलंबून आहे. त्यामुळे मार्गदर्शन आणि उपाययोजनांसाठी साईकृपा सेंद्रिय शेती गटाच्या वतीने बैठकीचे आयोजन केले होते. तज्ज्ञांनी योग्य मार्गदर्शन केले; मात्र बहुतांश बागायतदारांना कीटकनाशकांच्या फवारणीचा खर्च परवडणारा नाही. त्यामुळे शासनाने नुकसानग्रस्तांना भरपाई द्यावी आणि कीटकनाशके उपलब्ध करून द्यावीत. - रवींद्र पाटील, अध्यक्ष, साईकृपा सेंद्रिय शेती गट

माथेरानमध्ये ई-रिक्षाचालकांची मनमानी



। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरानमध्ये तब्बल १२ वर्षांच्या कायदेशीर लढ्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या परवानगीने सुरू झालेली पर्यावरणपूरक ई-रिक्षा सेवा आताकाही चालकांच्या मनमानीमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. स्थानिक नागरिकांच्या सोयीसाठी सुरू झालेल्या या सेवेतच स्थानिक महिलांना अपमानास्पद वागणूक मिळत असेल, तर या सेवेचा फायदा नेमका कोणाला? असा सवाल उपस्थित होत आहे. दस्तुरी नाका येथे दोन स्थानिक महिलांना ई-रिक्षातून सामानासह खाली उतरवण्याचा प्रकार घडला. त्यानंतर दुसऱ्या रिक्षातून प्रवास करताना दोन प्रवाशांना तीन जणांचे पूर्ण भाडे द्यावे लागल्याने महिला वर्गातून संताप व्यक्त होत आहे. या प्रकाराची माथेरान श्रमिक रिक्षा संघटनेनेही गंभीर •➤पान ५ वर

> माथेरानकरांनी ई-रिक्षा सेवा सुरू व्हावी यासाठी एकजुटीने प्रयत्न केले. मात्र, आज त्याच सेवेत स्थानिक नागरिकांना अशी वागणूक मिळत असेल, तर ही अत्यंत खेदजनक बाब आहे. वनिता डिगे आणि हेमा सावंत यांच्यासोबत दस्तुरी रिक्षा स्टँडवर घडलेला प्रकार निषेधार्ह आहे. वन ट्री हिल येथे जाण्यासाठी रिक्षात बसल्यानंतर कन्हैया नावाच्या चालकाने उद्धटपणे त्यांना सामानासह खाली उतरवले. त्यानंतर दुसरी रिक्षा घेताना दोन प्रवासी असूनही पूर्ण रिक्षाचे भाडे देण्याची वेळ त्यांच्यावर आली. स्थानिक नागरिकांच्या हक्काची पायमल्ली होता कामा नये. - सीताराम कुंभार, विरोधी पक्षनेते, माथेरान नगरपरिषद

विलीनीकरणाची बडबड

आता इन्स्टाग्रामचा जमाना आहे. तीस सेकंदांच्या रील्सची चलती आहे. पण एक काळ असा होता की, टीव्हीवर डेली सोप्स म्हणजे रोजच्या मालिका चालत. त्या मालिकांचे दळण कित्येक वर्षे दळले जात राही. सासूसुनेच्या अशा अनेक मालिका मराठी व हिंदीमध्ये लोकप्रिय होत्या. सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात अशाच एका मालिकेचे रोज दळण चालू आहे. तिचे नाव राष्ट्रवादीचे विलीनीकरण. शरद पवार आणि अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीचे विलीनीकरण होणार, चर्चा चालू, आज हे त्यांना भेटले, उद्या यांच्या बैठका झाल्या अशा बातम्या तास न तास चालवल्या जातात. एकीकडे सुप्रिया सुळे सांगतात की राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा विषय अजितदादांचा मृत्यू झाला तेव्हाच माझ्या लेखी संपला. रोहित पवार हेदेखील विलीनीकरणाला विरोध करतात. शरद पवार यांनीही पूर्वी असेच मत व्यक्त केले आहे. दुसऱ्या बाजूने विलीनीकरणाच्या मुद्द्याची कधी चर्चाच झालेली नव्हती असे दादा गटाचे नेते सांगत होते. अजितदादा गेले तेव्हा शशिकांत शिंदे आणि काही अन्य नेत्यांनी राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा छेडली. याबाबत दादांशी बोलणे झाले होते असे राष्ट्रवादीचे जयंत पाटील म्हणाले. पण तेव्हा ती दादा गटाच्या नेत्यांनी जोरात खोडून काढली. रायगडातले एक नेते म्हणाले की, अशी काही चर्चा झाली असती तर आम्हाला दादा नक्कीच काही बोलले असते. म्हणजे शरद पवार गटाच्या नेत्यांना येड्यात काढण्याचा तो प्रयत्न होता. आता तेच रायगडचे पलटूराम नेते अशी चर्चा झाली होती असे सांगत आहेत. दादा गेल्यानंतर या व अन्य काही नेत्यांनी पक्ष ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. पण सुनेत्रा व पार्थ पवार यांनी तो हाणून पाडला. म्हणून मग यांनी अमित शहा यांच्यामार्फत थेट भाजपशी संधान जुळवले. मध्यंतरी सुनेत्रा यांना डावलून त्यांनी परस्पर अमित शहा यांची भेट घेतली. त्याचे फोटो छापवून आणले. आटापिटा असा आहे की, राष्ट्रवादीचे खरे कर्तेधर्ते आम्ही आहोत.

भाजपचे कही पे निगाहें...

अमित शहा आणि भाजपला ही सगळी चांगली करमणूक आहे. दोन्ही गटांना खेळवत राहणे हे त्यांच्या फायद्याचेच आहे. त्यातही दादा गटात फूट पडून तो कमकुवत होत असेल आणि भाजपच्या कह्यात राहत असेल तर ते त्यांना हवेच आहे. असेही पार्थ पवारांच्या पुण्यातील जमिनींच्या प्रकरणामुळे ते अडचणीत आहेत. शिवाय सुनेत्रा यांच्याकडे पक्षाला नवसंजीवनी देण्याची ताकद आहे असे अजून तरी दिसलेले नाही. त्यामुळे त्यांनाही भाजपच्या आधाराची गरज आहे. पण भाजप कोणतीही मदत करतो त्याची दामदुप्पट किंमत वसूल करीत असतो. सध्या भाजपला डिलिमिटेशन किंवा मतदारसंघ फेररचनेचे वेध लागले आहेत. याबाबतची दुरुस्ती संसदेच्या गेल्या अधिवेशनात भाजपला संमत करून घेता आली नव्हती. भाजप आणि त्याचे चाणक्य अमित शहा यांना हा मोठाच दणका होता. भाजपने नेहमीप्रमाणे कही पे निगाहे कही पे निशाना असा प्रकार चालवला आहे. लोकसभेच्या मतदारसंघांची दर दहा वर्षांनी लोकसंख्येच्या हिशेबात फेररचना व्हावी अशी मूळ तरतूद आहे. पण उत्तरेतील राज्यातील लोकसंख्या भरमसाठ वाढली आहे. तर इतरत्र ती घटते आहे. या स्थितीत फेररचना झाली तर उत्तर भारतात लोकसभेच्या जागा वाढतील व दक्षिणेकडे कमी होतील अशी सार्थ भीती सर्व पक्षांना वाटते. त्यामुळे याला भाजपच्या गटातल्या तेलुगू देसम वगैरेंसह सर्वांचा विरोध आहे. दरम्यान महिलांना लोकसभेमध्ये ३३ टक्के आरक्षण देण्याचा प्रस्ताव भाजपच्या सरकारनेच चार वर्षांपूर्वी संमत करून घेतला आहे. मात्र तो करताना हे आरक्षण नवीन जनगणना झाली की तिच्या आधारे करावे अशी तरतूद करण्यात आली होती. मधल्या काळात २०२१ ची जनगणना भाजपने रोखून धरलेली होती व ती अजूनही झालेली नाही. २०२९ च्या निवडणुकांमध्ये महिला राखीव जागा लागू होऊ नयेत असे भाजपचे सुरुवातीचे डावपेच होते व त्यानुसारच हे चालले होते. पण आता भाजपला महिला मतदारच आपल्याला तारू शकतात हे ध्यानात आले आहे. त्यामुळे आता एकदम १८० अंशात बदल झाला आहे.

...म्हणून रायगडवाल्यांना ऊत

आता भाजपची खटपट अशी चालू आहे की, महिला राखीव जागा तात्काळ मंजूर व्हाव्यात. त्यासाठी पुढील जनगणनेसाठी थांबू नये. २०११ च्या गणनेच्या आधारे मतदारसंघांची फेररचना करावी आणि राखीव जागाही द्याव्यात असा त्याचा प्रयत्न आहे. अशा रीतीने एकीकडे मतदारसंघ फेररचना करण्याचे व दुसरीकडे महिला राखीव जागांचे उद्दिष्ट भाजपला साध्य करायचे आहे. फेररचना झाली तर सध्याच्या ५४३ लोकसभेच्या जागा आणखी किमान तीनशेने वाढतील. त्या ८५० जागांपैकी बहुतांश हिंदी पट्ट्यातील असतील. शिवाय ३३ टक्के म्हणजे सुमारे २८० जागांवर महिला निवडून येतील. इतक्या संख्येने महिलांना तिकिट देऊन निवडून आणणे हे सध्या भाजपलाच अधिक शक्य आहे. त्यामुळे काहीही करून ही दुरुस्ती संसदेत संमत करून घेण्याच्या मागे भाजप आहे. गेल्या वेळी शरद पवारांची राष्ट्रवादी, स्टालीन यांची द्रमुक आणि अखिलेश यांचा समाजवादी यांनी या प्रस्तावाला विरोध केला होता. मधल्या काळात दक्षिणेतील राज्यातील लोकसभेच्या जागा किमान दीड पट होणार असतील व तसे लेखी आश्वासन सरकार देणार असेल तर आपण पाठिंबा देऊ असे द्रमुकने म्हटले आहे. उत्तरेतल्या जागा कशाही वाढणार असल्याने समाजवादीची भूमिकाही सौम्य झाली आहे. शरद पवार गटाने याबाबत स्पष्ट भूमिका जाहीर केलेली नाही. मध्यंतरी सुप्रिया सुळे यांनी सरकारच्या प्रस्तावाचा विचार करण्याची तयारी दर्शवली होती. त्यामुळे शरद पवार गट भाजपच्या गळाला लागला असे चित्र तयार झाले होते. सध्या चालू असलेल्या विलीनीकरणाच्या चर्चेमागे हा एक मोठा पैलू आहे. हे पक्ष प्रत्यक्ष एकत्र विलीन होण्याची शक्यता सध्या तरी शून्य आहे. कारण मग आपण महायुती सोडून भाजपच्या गोटात जात आहोत असे शरद पवार गटाला अधिकृतपणे म्हणावे लागेल. शरद पवारांना ते मान्य होईल असे दिसत नाही. दुसरीकडे सुनेत्रा पवार यांचा गट एनडीएच्या आणि राज्यातल्या सत्तेच्या बाहेर पडणे हे सध्या पूर्ण अशक्य आहे. सत्ता आहे म्हणून किमान त्या पक्षात थोडी तरी धुगधुगी आहे. शिवाय सतेतून बाहेर पडले की या पक्षातल्या भानगडखोर नेत्यांच्या घरावर दुसऱ्या दिवशी इडीच्या धाडी पडतील. मागे किरीट सोमय्यांनी रायगडमधल्या यांच्या नेत्याच्या किती बेनामी कंपन्या आहेत त्याचा पाढा वाचला होताच. त्यामुळे सुनेत्रा गट भाजपला सोडणे शक्य नाही. या स्थितीत विलीनीकरणाची चर्चा नुसतीच उकळत ठेवायची आणि दरम्याच्या काळात त्याची पूर्वतयारी म्हणून मतदारसंघ फेररचनेला शरद पवार गटाचा पाठिंबा मिळवायचा असा भाजपचा यातला कावा आहे. दोन्ही पवार गट विलीन झाले किंवा न झाले तरी भाजपला त्यांचा उपयोग शून्य आहे. पण अमित शहांच्या फायद्यासाठी आणि त्यांच्याच आदेशावरून सध्या विलीनीकरणाच्या चर्चेचा डेली सोप चालू ठेवणे गरजेचे आहे. दादा गटाचे भानगडखोर नेते म्हणूनच त्याविषयी बडबड करीत आहेत.

विचार

धास्ती वीजटंचाई आणि दरवाढीची

देशात वीजटंचाईचे संकट गडद होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, स्वयंपाकघरातील ४१ वस्तूंच्या किंमतीमध्ये वाढ झाल्याचे निरिक्षकांनी निदर्शनाला आणले आहे. याच सुमारास आर्थिक आणि इतर कारणांमुळे मद्याच्या किंमती वाढण्याची शक्यता आहे. गेल्या काही काळात अर्थनगरीमध्ये थोडी धास्ती निर्माण करणाऱ्या बातम्याच जास्त प्रमाणात समोर आल्या आहेत.



महेश देशपांडे

जनसामान्यांसाठी तसेच औद्योगिक जगतासाठी एक महत्वाची बातमी आहे. देशात वीजटंचाईचे संकट गडद होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, स्वयंपाकघरातील ४१ वस्तूंच्या किंमतीमध्ये वाढ झाल्याचे निरिक्षकांनी निदर्शनाला आणले आहे. याच सुमारास आर्थिक आणि इतर कारणांमुळे मद्याच्या किंमती वाढण्याची शक्यता आहे. अर्थनगरीत अलिकडे थोडी धास्ती निर्माण करणाऱ्या बातम्याच जास्त प्रमाणात समोर आल्या आहेत.

गेल्या काही महिन्यांमध्ये भारताला पेट्रोल-डिझेल आणि गॅसच्या संकटाचा सामना करावा लागला. आता वर्षाच्या अखेरच्या तिमाहीमध्ये देशात वीजटंचाईचे संकटही निर्माण होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे अनेक राज्यांनी केंद्र सरकारकडे अतिरिक्त विजेची मागणी नोंदवली आहे. कोळशापासून वीजनिर्मितीत वाढ होऊनही मागणीनुसार वीजपुरवठा करणे कठीण होत आहे. सप्टेंबर २०२६ मध्ये भारतातील वीजटंचाई वाढून ५६ कोटी युनिट्सवर (५६० दशलक्ष किलोवॉट-तास) पोहोचली. ऑगस्ट २०२३ नंतरची ही सर्वात मोठी वीजटंचाई असल्याचे सांगितले जात आहे. राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, तमिळनाडू, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, छत्तीसगड आणि दिल्ली या राज्यांमध्ये विजेची कमतरता जाणवत आहे. त्यामुळे मागणी पूर्ण करण्यासाठी या राज्यांनी केंद्र सरकारकडे अतिरिक्त विजेची मागणी केली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी वीजटंचाई निर्माण होऊ नये, यासाठी राज्यांकडून अतिरिक्त व्यवस्था करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

देशातील वीजटंचाईमागे अनेक कारणे आहेत. त्यापैकी कमी पाऊस हे एक प्रमुख कारण आहे. पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने जलविद्युतनिर्मितीत घट होऊन वीजपुरवठ्यावर परिणाम झाला. दुसरीकडे, कोळशापासून होणाऱ्या वीजनिर्मितीत वाढ झाली. सप्टेंबरमध्ये कोळशावर आधारित वीजनिर्मिती १३.३ टक्क्यांनी वाढली; मात्र कोळशाचा मर्यादित साठा आणि वीजप्रकल्पांमधील देखभाल-दुरुस्तीच्या काम ांमुळे वाढती मागणी पूर्ण करणे कठीण झाले. 'ग्रीड इंडिया'च्या आकडेवारीनुसार, देशातील सुमारे ४७ टक्के कोळशावर आधारित वीजप्रकल्पांमध्ये कोळशाचा साठा अत्यंत कमी होता. यंदा हवामानातील बदलांचाही वीजेच्या मागणीवर परिणाम झाला. सामान्यापेक्षा अधिक उष्ण हवामानामुळे कूलर आणि वातानुकूलन यंत्रांचा वापर वाढला. त्याचबरोबर शेतीसाठी सिंचनाची गरज असल्याने विजेची मागणी कायम राहिली. वीजपुरवठा वाढवण्यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारांकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. केंद्र सरकार वीजटंचाईचा सामना करणाऱ्या राज्यांना अतिरिक्त वीज उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करत आहे. त्याचबरोबर देशांतर्गत कोळसा उत्पादन वाढवण्यावर भर दिला जात आहे. सौरऊर्जेपासून निर्माण झालेल्या विजेचा साठा करता यावा, यासाठी बॅटरी स्टोरेजची क्षमता वाढवण्याचे प्रयत्नही सुरू आहेत. या उपाययोजनांमुळे विजेची कमतरता कमी होण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे. मात्र विजेची मागणी आणि पुरवठा यांच्यातील तफावत कायम राहिल्यास काही राज्यांमध्ये नागरिकांना वीजकपातीचा सामना करावा लागू शकतो.

आता दुसरी दखलपात्र बातमी. गेल्या वर्षभरात स्वयंपाकाच्या ४२ पैकी ४१ वस्तूंच्या किंमतीत वाढ झाली आहे. कांद्याच्या दरांमध्ये तर ११३ टक्क्यांची वाढ झाल. महाराष्ट्रातील दुष्काळामुळे कांदा अजून महागण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. बटाटा वगळता ४१ वस्तूंच्या किंमतींमध्ये वर्षभरात मोठी वाढ झाली आहे. साखर २२ टक्क्यांनी तर सूर्यफुलाचे तेल १८ टक्क्यांनी महागले आहे. तांदूळ, गहू, डाळींच्या किंमतीतही वर्षभर सातत्याने वाढ होत आहे. सांख्यिकी मंत्रालयाने अलिकडेच जाहीर केलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, सप्टेंबरमध्ये किरकोळ महागाईचा दर ५.५ टक्के इतका वाढण्यामागे अन्नपदार्थांच्या वाढत्या किंमती हे मुख्य कारण ठरले आहे. सरकारकडून देखरेख केल्या जाणाऱ्या ४२ जीवनावश्यक वस्तूंपैकी ४१ वस्तूंच्या किरकोळ किंम तीत गेल्या वर्षभरात वाढ झाली आहे. केवळ बटाटा याला अपवाद ठरला आहे. ग्राहक व्यवहार विभागाच्या किंमत-देखरेख आकडेवारीनुसार, कांद्याच्या किमतीत सर्वाधिक सुमारे ११३ टक्के वाढ झाली आहे. त्यानंतर साखर (सुमारे २२ टक्के) आणि सूर्यफूल तेल (सुमारे १८ टक्के) यांचा क्रमांक लागतो. सप्टेंबरमध्ये किरकोळ महागाईचा दर ५.५ टक्क्यां(गेल्या दोन वर्षांमधील उच्चांक) पर्यंत पोहोचण्यामागे अन्नपदार्थांच्या वाढत्या किमती हे एक प्रमुख कारण होते. या महिन्यासाठी वार्षिक अन्नधान्य महागाईचा दर ७.७४ टक्के इतका नोंदवला गेला. विविध वस्तूंच्या श्रेणींमधील अधिकृत आकडेवारीवरून दिसून येते, की कडधान्यांमध्ये तूरडाळीच्या सरासरी किरकोळ किमतीत सर्वाधिक वाढ झाली आहे. तिचा दर प्रति किलो सुमारे १२९ रुपयांवर पोहोचला. वर्षभरापूर्वी तो ११३ रुपये होता.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सरकार लवकरच आपल्या राखीव साठ्यातून हरभरा बाजारात आणण्याचा विचार करू शकते. खाद्यतेलांमध्ये, सूर्यफूल तेलाच्या सरासरी किरकोळ किंमतीत सर्वाधिक वाढ होऊन प्रति लिटर १९१ रुपयांवर पोहोचली. वर्षभराच्या तुलनेत ही सुमारे १८ टक्क्यांची वाढ आहे. त्यानंतर पाम तेल आणि सोया तेलाचा क्रमांक लागतो, त्यांच्या किंमतीत अनुक्रमे १५.२ टक्के आणि १४.६ टक्के वाढ झाली आहे. मोहरीच्या तेलाचे भावही एका वर्षापूर्वीच्या १८८ रुपये प्रति लिटरवरून २०४ रुपये प्रति लिटरपर्यंत वाढले आहेत. तांदळाची सरासरी किंमत सुमारे १२ टक्क्यांनी वाढून ४७ रुपये प्रति किलो झाली आहे, तर गहू आणि गव्हाच्या पिठाच्या दरात किरकोळ वाढ झाली आहे. साखरेचे भाव ५६ रुपये प्रति किलो दरापर्यंत खाली आले आहेत. एका महिन्यापूर्वी ते सुमारे ५९ रुपये होते, तरीही ते एका वर्षापूर्वीच्या तुलनेत सुमारे २२ टक्क्यांनी जास्त आहेत. उत्पादनातील अपेक्षेपेक्षा कमी घट हे या दरवाढीचे कारण मानले जात आहे. प्रमुख भाज्यांचा विचार करता, कांद्याच्या किंमतीत जवळपास ११३ टक्क्यांची वाढ झाली. कांद्याचे भाव ५३ रुपये प्रति किलोवर स्थिर आहेत, तर बटाट्याच्या दरात सहा टक्क्यांपेक्षा अधिक घट झाली आहे. १२ ऑक्टोबरला टोमॅटो ४२ रुपये प्रति किलो दराने विकले जात होते. ते एका वर्षापूर्वी ३६ रुपये प्रति किलो होते. व्यापारीवर्गाच्या मते, कांद्याच्या दरातील या वाढीचे कारण म्हणजे देशातील सर्वाधिक कांदा उत्पादन करणाऱ्या महाराष्ट्रातील खरीप कांद्याच्या उत्पादनात झालेली अंदाजे पाच ते सात टक्क्यांची घट. लागवडीखालील क्षेत्रात झालेली घट आणि मान्सूनच्या पावसाला झालेला विलंब यामुळे ही घट झाली आहे.

आता मद्याच्या व्यवसायातील घडामोडींची ही एक रंजक वार्ता. सध्या रॉयल स्टॅग, ब्लेंडर्स प्राईड आणि मॅकडॉवेल्स यासारखे भारतातील लोकप्रिय मद्य ब्रँड बनवणाऱ्या कंपन्या सरकारी तपासणीखाली आहेत. कर अधिकाऱ्यांनी पर्नोड रिकार्ड आणि डियाजिओ या प्रमुख मद्य कंपन्यांनी केलेल्या आयातीची चौकशी सुरू केली आहे. कमी आयात शुल्क लागावे यासाठी या दोन कंपन्यांनी ब्रिटनमधून आयात केलेल्या काही स्कॉच व्हिस्की उत्पादनांचे चुकीचे वर्गीकरण केले असावे, असा संशय आहे. यामुळे आता मद्याच्या किंमती वाढणार का, असा सवाल उपस्थित होत आहे. या तपासाच्या अनुषंगाने कंपन्यांच्या कार्यालयांची तपासणी करण्यात आली. फ्रेंच मद्य कंपनी पर्नो ड रिकार्ड आणि ब्रिटनच्या डियाजिओची भारतीय शाखा असलेल्या 'युनायटेड स्पिरिट्स'ची चौकशी सुरू आहे. मिळालेल्या वृत्तानुसार, कर अधिकाऱ्यांनी गेल्या आठवड्यात दिल्लीजवळील पर्नोड रिकार्डच्या भारतीय मुख्यालयाला भेट देऊन स्कॉचच्या आयातीबाबत अधिकाऱ्यांची चौकशी केली. डियाजिओचे भारतीय युनिट असलेल्या 'युनायटेड स्पिरिट्स'ने शेअर बाजारांत स्पष्ट केले, की अधिकाऱ्यांनी त्यांच्या अनेक कार्यालयांमध्ये शोधमोहीम राबवली आहे. कंपनीने याला उद्योगव्यापी कारवाईचा भाग असल्याचे म्हटले आहे. ही चौकशी स्कॉच व्हिस्कीची आयात आणि वर्गीकरणाशी संबंधित आहे.

रॉयल स्टॅग आणि मॅकडॉवेल्स या कंपन्याही चर्चेत आहेत. कारण त्या भारतात विकल्या जाणाऱ्या मद्यासाठी परदेशातून मोठ्या प्रमाणात स्कॉच व्हिस्की कॉन्संट्रेट आयात करतात. त्यानंतर भारतात हे कॉन्संट्रेट इतर घटकांसोबत मिसळून वेगवेगळे ब्रँड तयार केले जातात. 'युनायटेड स्पिरिट्स'च्या पोर्टफोलिओमध्येही मॅकडॉवेल्ससारखे ब्रँड आहेत. भारत आणि ब्रिटन यांच्यातील व्यापार करारानुसार १५ जुलैपासून विशिष्ट प्रकारच्या स्कॉच व्हिस्कीच्या आयातीवरील सीमा शुल्क १५० टक्क्यांवरून ७५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले; मात्र कर अधिकाऱ्यांना संशय आहे, की मोठ्या प्रमाणात आयात केलेल्या 'स्कॉच कॉन्सन्ट्रेट'ला कमी केलेल्या शुल्काचा लाभ लागू होत नाही. त्यांना उल्लंघनाचे पुरावे आढळले, तर कंपन्यांवर अतिरिक्त कर किंवा इतर कारवाई होऊ शकते. तपास सध्या सुरू असला तरी निकाल अद्याप जाहीर करण्यात आलेले नाहीत.

चर्चा आजची

पाच मिनिटांच्या प्रवासासाठी एक तास!

राकेश लोहार

अलिबाग ते रेवदंडा मार्गावरील प्रवासाचीच सध्या सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे. मार्गावर अनेक ठिकाणी रस्ते खोदल्याने अवघ्या पाच-दहा मिनिटांत पूर्ण होणाऱ्या प्रवासासाठी नागरिकांना एक-दोन तास रस्त्यावर ताटकळत उभे राहावे लागत असेल, तर यापेक्षा मोठे दुर्दैव ते काय? एमएसआयडीसीकडून या रस्त्याचे रुंदीकरणासह काँक्रिटीकरणाचे काम रात्रंदिवस सुरू आहे. विकासकामांना कोणाचाही विरोध असण्याचे कारण नाही. उलट, चांगला आणि दर्जेदार रस्ता व्हावा, हीच प्रत्येकाची अपेक्षा आहे. मात्र, विकासाच्या नावाखाली सामान्य जनतेला वेठीस धरण्याचा अधिकार कोणालाही नाही. सध्या या रस्त्याच्या कामामुळे निर्माण झालेली परिस्थिती पाहता, ठेकेदारांच्या मनमानी कारभाराचा कळस झाल्याचेच दिसून येत आहे. याचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिक, वाहनचालक, नोकरदार, विद्यार्थी आणि स्थानिक व्यावसायिकांना बसत आहे. परंतु, जिल्हा प्रशासनाला याकडे लक्ष द्यायला वेळ नाही, हे खरोखरच आश्चर्यकारक आहे.

मागील महिनाभरापासून सामान्य जनता रस्त्याच्या कामांमुळे, धुळीमुळे आणि प्रचंड वाहतूक कोंडीमुळे हैराण झाली आहे. नागरिकांचा रोजचा प्रवास म्हणजे एक प्रकारची शिक्षा बनली आहे. मात्र, जिल्हा प्रशासनाचे अधिकारी वातानुकूलित केबिनमध्ये बसून या सगळ्या परिस्थितीपासून अनभिज्ञ असल्याचे चित्र आहे. कारण, रस्त्याच्या कामाबाबत कोणीही काहीही बोलायला तयार नाही. ठेकेदारांवर कोणाचेही नियंत्रण नसल्याप्रमाणे त्यांचा कारभार सुरू आहे. मनाला येईल तेव्हा रस्ता खोदायचा, मनाला येईल तेव्हा काँक्रिटीकरणाचे काम सुरू करायचे, वाहतुकीचे नियोजन नसले तरी चालेल, नागरिकांना कितीही त्रास झाला तरी चालेल, अशीच भूमिका संबंधितांनी घेतल्याचे दिसत आहे. मग, या कामावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी नेमकी कोणाची? ठेकेदारांच्या मनमानीला लगाम घालणार कोण?

मुळात, अलिबाग तालुका हा पर्यटनासाठी ओळखला जातो. येथील नागाव, चौल, रेवदंडा आणि याच मार्गावरून पुढे मुरुड, श्रीवर्धन आदी पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या पर्यटकांची सुट्टीच्या दिवशी मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. शनिवार आणि रविवार या दोन दिवसांत तर पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. येथील स्थानिक नागरिकांचे अनेक छोटे-मोठे व्यवसाय पर्यटनावर अवलंबून आहेत. हॉटेल व्यावसायिक, खाद्यपदार्थ विक्रेते, छोटे व्यावसायिक, रिक्षाचालक, मिनिडोअर चालक अशा असंख्य लोकांचा उदरनिर्वाह या पर्यटन व्यवसायावर अवलंबून आहे. मात्र, रस्त्याच्या कामांच्या अनियोजित पद्धतीमुळे या व्यवसायालाही मोठा फटका बसत आहे. पर्यटकांना पर्यटनाचा आनंद घेण्याऐवजी रस्त्यावरच तासन्तास अडकून पडावे लागत असेल, तर ते पुन्हा या भागात येण्याचा विचार तरी करतील का? पर्यटन वाढविण्याच्या गप्पा मारणाऱ्या प्रशासनाला या वास्तवाचे भान आहे का?

सुट्टीच्या दिवसांत आणि शनिवार-रविवारच्या काळात पर्यटकांचा ओघ मोठ्या प्रमाणात असतो. त्यामुळे या दिवसांत रस्त्याची कामे पूर्णतः बंद ठेवणे किंवा किमान वाहतुकीला अडथळा होणार नाही, अशा पद्धतीने कामाचे नियोजन करणे गरजेचे आहे. मात्र, एमएसआयडीसीच्या ठेकेदारांना आणि कर्मचाऱ्यांना याबाबत सांगितल्यानंतरही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र आहे. नागरिकांच्या तक्रारींना केराची टोपली दाखवून आपलीच मनमानी सुरू ठेवली जात आहे. परिणामी, मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे.

प्रवासी वाहतूक करणाऱ्यांचा तर धंदाच पूर्णपणे बुडाला आहे. दिवसातून चार-चार फेऱ्या अलिबाग ते रेवदंडा अशा मारणाऱ्या मिनिडोअर चालकांना आता एक फेरी पूर्ण करणेही कठीण बनले आहे. एका फेरीसाठी तासन्तास लागत असल्याने त्यांच्या उत्पन्नावर थेट परिणाम होत आहे. इंधनाचा खर्च, वाहनांचे हप्ते आणि रोजचा खर्च भागवायचा कसा, असा प्रश्न या चालकांसमोर निर्माण झाला आहे. मात्र, या सगळ्याचे कोणालाही सोयरसुतक नाही. सामान्य माणसाच्या रोजीरोटीवर परिणाम होत असताना संबंधित यंत्रणा मात्र सुस्त असल्याचे चित्र आहे.

सकाळपासून सुरू असलेली कामे रात्रीपर्यंत, किंबहुना रात्रभर तशीच सुरू असतात. कामावर जाण्याच्या वेळेत रस्ता खोदलेला, वाहतुकीसाठी अरुंद जागा आणि वाहनांच्या लांबच लांब रांगा, असे चित्र रोजच पाहायला मिळते. त्यामुळे सकाळी कामावर जाणाऱ्या नोकरदारांना वेळेत पोहोचता येत नाही, तर सायंकाळी घरी परततानाही त्यांना तासन्तास रस्त्यावरच अडकून राहावे लागते. नागरिकांच्या दिवसातील महत्त्वाचा वेळ केवळ नियोजनशून्य कामांमुळे वाया जात आहे. याची जबाबदारी कोण घेणार? नागरिकांनी कामावर वेळेत पोहोचू नये, विद्यार्थ्यांनी शाळा चुकवावी आणि व्यावसायिकांनी आपला व्यवसाय बंद ठेवावा, अशीच अपेक्षा संबंधित यंत्रणांची आहे का?

जिल्हा प्रशासन याबाबत किती जागरूक आहे, हाच खरा प्रश्न आहे. पोलीस यंत्रणेलाही सुट्टीच्या दिवसांत या मार्गावरील रहदारीची पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे सुट्टीच्या काळात रस्त्याच्या कामांना परवानगी मिळतेच कशी? वाहतुकीची परिस्थिती माहीत असतानाही अशा पद्धतीने कामे सुरू ठेवली जात असतील, तर नियोजनाचा अभाव कोणाचा आहे? संबंधित ठेकेदारांचा, एमएसआयडीसीचा की जिल्हा प्रशासनाचा? केवळ कागदावर नियोजन करून प्रत्यक्षात नागरिकांना वाऱ्यावर सोडण्याचा हा प्रकार आता थांबला पाहिजे.

या सगळ्या भोंगळ आणि नियोजनशून्य कारभाराचा फटका सामान्य जनतेला बसत आहे. पाच-पाच मिनिटांच्या प्रवासासाठी एक-दोन तासांची रखडपट्टी होत असेल, तर अशा कामांच्या नियोजनाला काय म्हणावे? रस्ता चांगला व्हावा, यासाठी नागरिक आज त्रास सहन करत आहेत. मात्र, हा त्रास किती काळ सहन करायचा, यालाही काही मर्यादा आहेत. प्रशासनाने वातानुकूलित केबिनमधून बाहेर पडून एकदा प्रत्यक्ष या रस्त्यावर उभे राहावे आणि सामान्य नागरिकांची होणारी फरफट अनुभवावी. पाच मिनिटांच्या प्रवासासाठी एक-दोन तास रस्त्यावर अडकून पडण्याची वेळ प्रशासनातील अधिकाऱ्यांवर आली, तरच कदाचित या समस्येची तीव्रता त्यांच्या लक्षात येईल. जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने यामध्ये तातडीने लक्ष घालून कामाच्या वेळा निश्चित कराव्यात, वाहतूक सुरळीत ठेवावी आणि सामान्य नागरिकांचा खोळंबा थांबवावा, एवढीच अपेक्षा!

लोकसंसद

आला हिवाळा, तब्येत सांभाळा!

यंदा राज्यात पावसाने प्रचंड ओढ दिल्यामुळे अनेक ठिकाणी दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. दुष्काळाचे सावट पडलेली यंदाची दिवाळी लोकांनी यथाशक्ती साजरी केली. दिवाळी संपता संपता सध्या वातावरणात गारवा पसरत असून पहाटे आणि सायंकाळच्या सुमारास मुंबईसह राज्यात थंडीची चाहूल लागली आहे. नुकतीच काश्मीरच्या गुलमर्ग येथे सर्वांत कमी उणे २.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. काश्मीरसह हिमालयात बर्फवृष्टी सुरू झाल्याने त्या शीतलहरी महाराष्ट्राकडे येत आहेत. त्यामुळे राज्यातील बहुतांश भागांत गारठा वाढला असून गोंदियाचा पारा १२.८ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आला होता. त्यापाठोपाठ जळगाव १३ अंश सेल्सिअस, नाशिक १३.९, यवतमाळ १४, सातारा १४.४, पुणे १४.६ अशा अनेक ठिकाणी पारा घसरला होता. मुंबईतही १८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. खरे तर थंडीचे हे हवेहवेसे दिवस शरीराच्या आरोग्यासाठी उत्तम समजले जातात. पण तब्येतीकडे लक्ष देणेही तितकेच महत्वाचे असते. कारण थंडीच्या दिवसात सर्दी, खोकला, सांधेदुखी आणि विविध प्रकारच्या ॲलर्जीसह त्वचेचे आजार, व्हायरल इन्फेक्शन आणि डेंग्यू, मलेरियासारखे इतरही अनेक आजार होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत आजारांना दूर ठेवण्यासाठी आणि शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी नियमित व्यायाम आणि संतुलित आहाराचे सेवन करणे गरजेचे आहे.

-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

मराठी माणसाच्या मनात स्वाभिमानाची ज्योत पेटवणारे बाळासाहेब!

१७ नोव्हेंबर हा दिवस महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक इतिहासातील एका महत्त्वाच्या व्यक्तिमत्त्वाच्या स्मृती जागवणारा दिवस आहे. याच दिवशी २०१२ मध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे निधन झाले. मराठी माणसाच्या हक्कांसाठी आवाज उठवणारे, आपल्या आक्रमक वक्तृत्वाने लाखो लोकांना प्रभावित करणारे आणि व्यंगचित्रांच्या माध्यमातून सामाजिक व राजकीय परिस्थितीवर भाष्य करणारे बाळासाहेब आज आपल्यात नाहीत. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या कार्याचा आणि व्यक्तिमत्त्वाचा आढावा घेणे उचित ठरेल.

बाळासाहेब ठाकरे यांचा जन्म २३ जानेवारी १९२६ रोजी पुणे येथे झाला. त्यांचे वडील प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे हे थोर समाजसुधारक, विचारवंत आणि लेखक होते. वडिलांकडूनच बाळासाहेबांना सामाजिक कार्याचे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचे बाळकडू मिळाले. प्रबोधनकारांचे पुरोगामी विचार, स्पष्टवक्तेपणा आणि आक्रमक वृत्ती यांचा प्रभाव बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वावर पडला.

बाळासाहेबांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात एक व्यंगचित्रकार म्हणून केली. १९५० च्या दशकात त्यांनी फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम केले. आपल्या कुंचल्याच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, राजकीय आणि सार्वजनिक प्रश्नांवर मार्मिक भाष्य केले. याच काळात त्यांचा प्रसिद्ध व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांच्याशी परिचय झाला. पुढे बाळासाहेबांनी व्यंगचित्रकलेत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

मराठी माणसांच्या प्रश्नांना व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या हक्कांविषयी जनजागृती व्हावी, या उद्देशाने बाळासाहेबांनी १३ ऑगस्ट १९६० रोजी 'मार्मिक' या साप्ताहिकाची सुरुवात केली. या साप्ताहिकाच्या माध्यमातून त्यांनी मुंबईतील मराठी माणसांच्या रोजगाराचा प्रश्न, त्यांच्यावर होणारा अन्याय आण

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१७ नोव्हेंबर

१) श्री. प्रकाश पांडुरंग सप्रे, मु.थळ, अलिबाग
१७-११-१९४७

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

आजचे अन्नदाते

रेश्मा वसंत कडवे,
वाढदिवस, सारळ, अलिबाग

समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची गर्दी

अलिबाग : सलग सुट्ट्यांचा आनंद लुटण्यासाठी पर्यटकांनी कोकणातील समुद्रकिनाऱ्यांकडे धाव घेतली आहे. अलिबागच्या निसर्गरम्य समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची मोठी गर्दी पाहायला मिळत असून, संपूर्ण किनारपट्टी पर्यटकांनी गजबजून गेले होते. समुद्रकिनाऱ्यावर वाळूचे किल्ले बांधण्यापासून ते वॉटर स्पोर्ट्स, हॉर्स रायडिंग अशा विविध साहसी आणि मनोरंजक ॲक्टिव्हिटीचा आनंद पर्यटक घेत आहेत.

निधीअभावी जलजीवन योजना रखडली

■ सह्याद्रीवाडीकरांची पाण्यासाठी दहा किलोमीटरची पायपीट

। महाड । उदय सावंत ।

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्याच्या शेवटच्या टोकाला असलेल्या सह्याद्रीवाडी गावात पाणीटंचाईचे भीषण वास्तव समोर आले आहे. शासनाच्या जलजीवन मिशनअंतर्गत सुरू करण्यात आलेली नळपाणीपुरवठा योजना निधीअभावी अपूर्ण राहिल्याने गावातील सुमारे ४५ कुटुंबांतील २०० ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी काही किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे. विशेष म्हणजे महिलांना दिवसातून दोन वेळा पाण्यासाठी जंगलातून ये-जा करावी लागत असल्याने त्यांची मोठी परवड होत आहे. कोट्यवधी रुपयांच्या योजनांच्या घोषणा होत असताना दुर्गम भागातील नागरिकांना मात्र आजही पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र आहे.

महाड तालुक्यातील आंबे शिवथर ग्रामपंचायत हद्दीत



सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये सह्याद्रीवाडी हे दुर्गम गाव वसले आहे. दरडग्रस्त गावांच्या यादीत समावेश असलेल्या या गावात दरवर्षी तीन ते चार हजार मिलिमीटर पावसाची नोंद होते. मात्र यंदा पावसाचे प्रमाण कमी झाल्याने गावात पाणीटंचाई निर्माण झाली आहे. परिणामी, ग्रामस्थांना काट्याकुट्यातून आणि घनदाट जंगलातून सुमारे दहा किलोमीटर अंतर पार करून पिण्याचे पाणी आणावे लागत आहे. पाण्यासाठी महिलांना दररोज दोन वेळा ये-जा करावी लागत असल्याने त्यांचा दिवसातील मोठा वेळ पाणी भरण्यातच जात आहे.

गावाचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सुटावा, यासाठी राज्य शासनाच्या जलजीवन मिशनअंतर्गत नळपाणीपुरवठा योजनेचे काम हाती घेण्यात आले होते. मात्र नाशिक येथील संबंधित ठेकेदाराने निधीअभावी काम अपूर्ण सोडल्याची माहिती समोर आली आहे. परिणामी, योजनेचे काम रखडले असून गावकऱ्यांना अद्याप नळाद्वारे पाणी मिळू शकलेले नाही. याबाबत महाड पंचायत समितीच्या पाणीपुरवठा विभागाचे उपविभागीय अभियंता जगदीश फुलपगारे यांनीही निधीअभावी योजनेचे काम रखडल्याचे स्पष्ट केले आहे.

पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी शासनाकडून नदीवर बंधारे बांधण्याची योजनाही हाती घेण्यात आली आहे. मात्र पावसाने सप्टेंबर महिन्यातच ओढ दिल्यानंतर अशा उपाययोजनांची वेळेत आणि प्रभावी अंमलबजावणी झाली असती, तर आज ग्रामस्थांवर पाण्यासाठी जंगलातून भटकंती करण्याची वेळ आली नसती, अशी भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

प्रशासन ठोस पावले उचलणार कधी?

शासनाच्या जलजीवन मिशनचे उद्दिष्ट प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचविण्याचे असताना सह्याद्रीवाडीतील ग्रामस्थांना मात्र आजही पाण्यासाठी किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे. निधीअभावी रखडलेले काम तातडीने पूर्ण करून सह्याद्रीवाडीचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी प्रशासन आणि शासन कधी ठोस पावले उचलणार, असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

निवडक



अखंड विश्वशांती हरीनाम सप्ताह

कोलाड : सद्गुरु गोपाळबाबा महाराज अलिबागकर यांचे ३४वे पुण्यस्मरण शुक्रवार दि.२७ नोव्हेंबर रोजी श्री सद्गुरु गणपतबाबा अलिबागकर महाराज मठ, कासार घाट, श्री क्षेत्र पंढरपूर येथे साजरा होणार आहे. या पुण्यस्मरण उत्सवानिमित्ताने अखंड विश्वशांती हरीनाम सप्ताह बुधवार दि.२५ ते शनिवार दि.२८ नोव्हेंबरपर्यंत साजरा होणार आहे. या निमित्ताने दररोज पहाटे ४ ते ६ श्रींची काकड आरती, भजन, सकाळी ६.३० ते ८.३० नित्यपूजा, ९.३० ते १२.३० वाजता श्री. तुकोबाराय गाथा भजन, दुपारी १ ते ४ भोजन व विश्रांती, सायंकाळी ४ ते ५ प्रवचन,५ ते ६.३० हरिपाठ, रात्री ७ ते ९ हरिकीर्तन व त्यानंतर जागरण होईल. तर शुक्रवार दि.२७ नोव्हेंबर रोजी सकाळी महाराजांच्या पुण्यस्मरणानिमित्त पहाटे श्रींची महापूजा, अभिषेक, दिंडी प्रदक्षिणा नंतर ११ ते १पुण्यस्मरणानिमित्त किर्तन होईल. शनिवार दि.२८ रोजी सकाळी १० ते १२ काल्याच्या किर्तनाने कार्यक्रमाची सांगता होईल.

सायबर ठगांना बँक खाते पुरवणारा गजाआड

मुंबई : सायबर ठगांना बँक खाते पुरवणाऱ्याला गुन्हे शाखेच्या युनिट-८ ने गजाआड केले. वसीम खान असे आरोपीचे नाव असून त्याच्याकडून काही मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. धारावी येथे राहणारा एक जण सायबर ठगांच्या संपर्कात असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट ८ला मिळाली. त्या माहितीची पोलिसांनी सत्यता पडताळली. पोलीस निरीक्षक सावंत यांच्या पथकातील उपनिरीक्षक हेमंत मिरजे, बाराहाते, अतिग्रे, सटाले, जाधव आदींच्या पथकाने धारावी येथे एका रूममध्ये छापा मारला. छापा मारून पोलिसांनी वसीमला ताब्यात घेतले. त्याच्या घराची झडती घेतली. पोलिसांनी त्या घरातून एक मोबाईल, ३३ सिमकार्ड, २३ एटीएम कार्ड, तीन बँकांचे पासबुक, बँकेचे अर्ज, चार चेक, सहा बँकेची पत्र, बँक खात्याची नोंद वही आणि एक डायरी पोलिसांनी जप्त केली. वसीम हा काही सायबर ठगांच्या संपर्कात होता. त्याने काही लोकांचे आधारकार्ड, पॅनकार्ड असे दस्तावेज बनवले. त्या दस्तावेजाच्या माध्यमातून त्याने बँकेत बचत खाते आणि बनावट नावाने खाती उघडली होती. बँक खाते सुरू करण्यासाठी त्याने विविध मोबाईल कंपनीचे सिमकार्ड प्राप्त केले होते. ते सिम कार्ड बँक खात्यासोबत ऑक्टिव्ह करून ते सायबर ठगांना देत असायचा. त्या खात्याचा वापर ऑनलाइन फसवणूक, गेमिंगची रक्कम जमा करण्यासाठी केला जात होता. वसीमला अटक करून न्यायालयात हजर केले असता त्याला पोलीस कोठडी सुनावली आहे.

२५० भाविकांना स्वखर्चाने घडविले वेताळ देवाचे दर्शन



। चिरनेर । प्रतिनिधी ।

दिघोडे गावचे दानशूर व्यक्तिमत्व तथा वेताळ देवाचे भक्त नाखवा हरिश्चंद्र चंदू नाखवा आणि त्यांची सहचारणी नाकवीन शोभा हरिश्चंद्र नाखवा या दाम्पत्यांनी आपल्या नीलकमल माऊली बोटीतून स्वखर्चाने २५० भाविकांना खंदेरी उंदेरी येथील वेताळ देवाचे दर्शन घडविले. यात आगरी कोळी, कराडी समाजातील लोकांसह नातेवाईक, सगे सोयरे व मित्र मंडळी सहभागी झाली होती. लहान मुलांसह तरुण मुले, महिला या सर्वांनी धमाल मस्ती केली. यावेळी वेताळ देवाच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी नाश्तादेखील देण्यात आला. यावेळी आई एकविरेच्या कृपेने आणि वेताळ देवाच्या आशीर्वादाने धंद्यामध्ये अजून दोन बोटी येण्याची आणि भरभराट हाण्याची सर्वांनी देवाला मनापासून प्रार्थना केली.

आंबा-काजू झाडे मोहोरण्यास सुरुवात

■ बागायतदारांमध्ये समाधानाचे वातावरण

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून थंडी पडण्यास सुरुवात झाल्याने आंबा आणि काजू बागायतदारांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. विशेषतः वेंगुर्ला, मालवण आणि देवगड तालुक्यांतील काही भागांत आंबा व काजूच्या झाडांवर मोहोर दिसू लागला आहे. त्यामुळे बागायतदारांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

पुडाळ तालुक्यातील विविध गावांमधील आंबा बागांमध्येही सध्या कोवळ्या पालवीचे चित्र पाहायला मिळत आहे, तर किनारपट्टी भागातील काही बागांमध्ये मोहोर चांगल्या प्रमाणात



येण्यास सुरुवात झाली आहे. समुद्राकडून वाहणारे खारे वारे आणि वातावरणातील थंडी यांचा झाडांच्या मोहोर प्रक्रियेवर परिणाम होत असल्याचे बागायतदारांचे म्हणणे आहे. मात्र, यंदा पावसाच्या अनियमिततेमुळे आंबा-काजू उत्पादकांसमोर काहीशी अनिश्चितता निर्माण झाली आहे.

या भागात साधारणतः जानेवारीअखेर आंब्याचे पीक तयार होण्यास सुरुवात होते. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवडय़ात आंबा पीक पूर्णपणे तयार होते. मात्र गेल्या चार महिन्यांत पुरेसा पाऊस झालेला नाही. त्यामुळे जमिनीतील ओलावा कमी झाला आहे. अशा परिस्थितीत यंदाच्या हंगामाबाबत अनिश्चितता असल्याचे बागायतदारांकडून सांगण्यात येत आहे.

पान ३ वरुन

४५० आदिवासींच्या जमिनीवर डल्ला

जमिनी बळकावल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. तसेच काही जमीन दलालांना हाताशी धरून अनधिकृतपणे बॉक्साइट उत्खनन सुरू करण्यात आल्याचा दावाही आदिवासी बांधवांनी केला आहे. उत्खननातून आर्थिक फायदा घेतला जात असताना स्थानिकांच्या वाट्याला मात्र नुकसान आणि उपेक्षाच येत असल्याची भावना आदिवासी समाजातून व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, उत्खनन सुरू असलेल्या परिसरातील नागरिकांना पाणी, रस्ते आणि वीज यांसारख्या मूलभूत सुविधाही उपलब्ध करून देण्यात आलेल्या नसल्याची नाराजी आहे. मग उत्खननातून फायदा कोणाचा आणि नुकसान कोणाचे, असा सवाल उपस्थित होत आहे.

दरम्यान, व्याघ्रेश्वर इंडस्ट्रीयल प्रोड्युसर्स सोसायटीचे अध्यक्ष अशोक पाटील यांनी हे उत्खनन अधिकृत असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, बॉक्साइट उत्खननासाठीचा भाडेकरार सुमारे २० वर्षांपूर्वी करण्यात आला असून, सर्व शासकीय नियमांचे पालन करूनच उत्खनन सुरू आहे. हा भाडेकरार २०२८ मध्ये संपणार असून, त्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना त्यांची जमीन परत मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

मात्र, सोसायटीच्या या स्पष्टीकरणानंतरही आदिवासी बांधवांचा संताप कमी झालेला नाही. भाडेकरार आणि अधिकृत उत्खननाचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात जमिनींचे नुकसान होत असल्याचा स्थानिकांचा आरोप आहे. त्यामुळे या संपूर्ण व्यवहाराची कागदपत्रांसह सखोल तपासणी होणे गरजेचे आहे. जमिनींच्या मालकीपासून ते उत्खननाच्या परवानग्यांपर्यंत सर्व बाबींची प्रशासनाने पारदर्शक चौकशी करावी आणि आदिवासी बांधवांना न्याय द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

आदिवासींच्या जमिनींच्या प्रश्नाकडे प्रशासनाने दुर्लक्ष करू नये. उत्खनन तात्काळ बंद करून जमिनींचे होणारे नुकसान थांबवावे, अशी ठाम भूमिका स्थानिकांनी घेतली आहे. प्रशासनाने वेळीच दखल घेतली नाही आणि उत्खनन सुरूच राहिले, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा आदिवासी बांधवांनी दिला आहे. त्यामुळे महालमिच्या परिसरातील बॉक्साइट उत्खननाचा प्रश्न आता चांगलाच तापण्याची चिन्हे आहेत.

फुग्याने घेतला चिमुकल्याचा जीव

मुलाला वाचविण्यासाठी आईने अखेर त्याला खांद्यावर घेत रुग्णालयाच्या दिशेने धाव घेतली. वाटेत मिळेल त्या वाहनाला हात दाखवत मदतीसाठी आर्त हाक दिली. मात्र, काळाने तिची ही धडपडही अपुरी ठरवली. रुग्णालयात दाखल करताच डॉक्टरांनी आरंशला मृत घोषित केले.

चक्रव्यूह भेदून बाहेर पडणारा मी योद्धा

परिस्थितीत सोडणार नाही, असा सूचक इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांनी दिला.

अलिबाग येथे सोमवारी दि. १६ रोजी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. शिंदे गटाच्या आमदारांकडून आणि पालकमंत्र्यांकडून होत असलेल्या टीकेला उत्तर देताना तटकरे यांनी आपल्या चार दशकांच्या राजकीय प्रवासाचा संदर्भ दिला. २००२ मधील जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडीपासून ते २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपर्यंतच्या राजकीय घडामोडींचा उल्लेख करत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. महायुतीतील घटक पक्षांनी लोकसभा निवडणुकीत सहकार्य केले असून, महायुतीच्या आमदारांविरोधात काम केल्याचा आरोप करणाऱ्यांनी पुरावे द्यावेत, असे खुले आव्हानही त्यांनी दिले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाच्या चर्चेलाही तटकरे यांनी पूर्णविराम दिला. सुप्रिया सुळे यांनी या विषयावर भूमिका स्पष्ट केल्यानंतर आमच्याकडूनही विलीनीकरणाचा विषय संपला असल्याचे त्यांनी सांगितले.पालकमंत्र्यांच्या नियुक्तीनंतर आपण त्यांचे अभिनंदन करून जिल्ह्याच्या विकासासाठी एकत्र काम करण्याची भूमिका मांडली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या माध्यमातून रायगडच्या विकासाला गती मिळाली पाहिजे. विकासाच्या कामात आपण अपयशी ठरलो तर काळही आपल्याला माफ करणार नाही, असे तटकरे म्हणाले.

अलिबागमधील सुमारे ७०० कोटींच्या मेडिकल कॉलेज प्रकल्पाचा मुद्दा उपस्थित करताना त्यांनी प्रकल्पाला होणारा विलंब आणि भूसंपादनाचा प्रश्न मांडला. शेतकऱ्यांना २०१३ च्या कायद्यानुसार योग्य मोबदला मिळावा, यासाठी आपण पाठपुरावा करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. टोरंटचा कर्जत ऊर्जा प्रकल्प, टाटाचा भिवपुरी जलविद्युत प्रकल्प आणि माणगावमधील पंप स्टोरेज प्रकल्पांबाबत बोलताना पर्यावरणीय परिणाम, वृक्षतोड आणि ग्रामस्थांच्या शंकांचे निरसन करूनच पुढील निर्णय घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.अलिबाग-रोहा मार्गावरील दुरवस्था आणि पुलांच्या कामांमुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक समस्येवरही त्यांनी भाष्य केले. जिल्हाधिकाऱ्यांनी अवजड वाहनांबाबत आदेश दिल्यानंतरही वाहतूक सुरू असल्याने नागरिकांना त्रास होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

राजकीय जीवनात अनेक चढ-उतार पाहिले असून, टीका करताना भाषेचा आणि वैचारिक स्तराचा तोल आपण कधीही ढळू दिला नाही. विरोधकांना बोलण्याचा अधिकार आहे; मात्र आपण रायगडच्या विकासासाठी काम करत राहणार आहोत, असेही तटकरे यांनी ठामपणे सांगितले. यावेळी हर्षल पाटील, चारहास मगर, जिल्हा परिषद सदस्य अमित नाईक आणि तालुका अध्यक्ष जयेंद्र भगत उपस्थित होते.

दिव्यांगांसाठीच्या सायकली धूळखात

करण्यात आली, किती नग खरेदी झाले, त्यासाठी किती निधी खर्च झाला, तसेच प्रत्यक्ष किती दिव्यांग लाभार्थ्यांना त्यांचे वाटप करण्यात आले, याची माहिती जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय लाभार्थ्यांची यादी उपलब्ध करून देण्याबरोबरच सायकलींच्या दुरवस्थेला जबाबदार असणाऱ्या अधिकारी किंवा ठेकेदारांची चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. दुरुस्ती करून वापरण्यायोग्य असलेल्या सायकली तातडीने दुरुस्त करून गरजू दिव्यांगांना वितरित कराव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. येत्या १५ दिवसांत याप्रकरणी चौकशी करून कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही सुरेश खरात यांनी दिला आहे.

प्लॅटिनम गोदामात आगीचे तांडव

प्रशासनाने काय चौकशी केली? कोणावर कारवाई केली? गोदामातील अग्निसुरक्षा यंत्रणेचे ऑडिट झाले का? की चौकशीच्या नावाखाली प्रकरणावर पडदा टाकण्यात आला? एकाच गोदामात पुन्हा आग लागणे ही साधी घटना नसून, प्रशासनाच्या तपासणी यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उभे करणारी बाब आहे.

गोदामात अतिज्वलनशील रासायनिक पदार्थ साठवण्याचा अधिकृत परवाना होता का? केमिकल साठवणुकीसाठी आवश्यक परवानग्या घेतल्या होत्या का? फायर एनओसी आणि अग्निसुरक्षेचे नियम पाळले होते का? गोदाम अधिकृत आहे की अनधिकृत, याचे उत्तर प्रशासनाने जनतेला द्यावे. नियमबाह्य साठवणूक आढळल्यास गोदाम मालकासह संबंधित जबाबदारांवर कठोर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. उरण तालुक्यातील अनेक ग्रामपंचायत हद्दींमध्ये कंटेनर यार्ड आणि गोदामांचे पेव फुटले आहे. काही ठिकाणी शासनाच्या नियमांना धाब्यावर बसवून गोदामे उभारली जात असल्याचे आरोप होत आहेत. मात्र, परवाने तपासणाऱ्या यंत्रणा, अग्निशमन विभाग आणि स्थानिक प्रशासन नेमके कोणाच्या प्रतीक्षेत आहे? नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का? प्लॅटिनम गोदामातील आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. गोदाम मालक आणि प्रशासनाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून गोदामाचे बांधकाम, परवाने, केमिकल साठा, फायर ऑडिट आणि सुरक्षाव्यवस्थेची तपासणी करणे अत्यावश्यक बनले आहे. औद्योगिक विकासाच्या नावाखाली उरणला आगीच्या ज्वाळांच्या हवाली करणार का? गोदाम ांना परवाने देताना आणि त्यांची तपासणी करताना प्रशासनाचे डोळे मिटले आहेत का? वारंवार आगीच्या घटना घडूनही कारवाई होत नसेल, तर नागरिकांनी न्याय मागायचा तरी कोणाकडे?

ब्लँकेट खरेदीसाठी नागरिकांची लगबग

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

पनवेल शहरासह ग्रामीण भागातील वातावरणात हळूहळू बदल जाणवू लागला असून, हिवाळ्याची चाहूल लागली आहे. गेल्या काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी हवेत गारवा वाढत असून, पहाटेच्या सुमारास थंड वातावरणाचा अनुभव नागरिकांना येत आहे. विशेषतः ग्रामीण भागात रात्रीची थंडी जाणवू लागली असून, शहरातही पहाटेच्या वेळी थंडावा वाढत



आहे. हिवाळ्याच्या आगमनाची चाहूल लागताच नागरिकांनी थंडीपासून बचाव करण्यासाठी तयारी सुरू केली आहे. बाजारपेठेत ब्लँकेट, चादरी तसेच उबदार कपड्यांची आवक होऊ लागली असून, नागरिकांकडून आतापासूनच ब्लँकेट खरेदीला पसंती दिली जात आहे. रात्री उशिरा घरी परतणारे नागरिक, पहाटे कामानिमित्त बाहेर पडणारे कामगार आणि ज्येष्ठ नागरिकांना या थंडीचा विशेष अनुभव येत आहे. नोव्हेंबर महिन्याच्या मध्यापासून वातावरणात जाणवणारा हा बदल हिवाळा ऋतूच्या आगमनाची नांदी मानली जात आहे. आगामी दिवसांत थंडीचा जोर वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन नागरिकांनी उबदार कपड्यांसह आवश्यक ती काळजी घेण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे पनवेलकरांना आता गुलाबी थंडीचे वेध लागले आहेत.

माथेरानमध्ये ई-रिक्षाचालकांची मनमानी

दखल घेतली आहे. माथेरानच्या रहिवासी हेमा सावंत आणि वनिता डिगे या दोघी रविवारी सायंकाळी दस्तुरी रिक्षा स्टँडवरून वन ट्री हिल येथे जाण्यासाठी ई-रिक्षात बसल्या. त्यांचा नंबर आल्यानंतर त्या रिक्षा क्रमांक दोनमध्ये बसल्या. मात्र, संबंधित रिक्षाचालक कन्हैया यांनी त्यांना रिक्षातून उतरण्यास सांगितले. 'ही रिक्षा तिकडे जाणार नाही, त्या खडबडीत रस्त्यावरून कोण जाणार?' असे सांगत चालकाने अरेरावी सुरू केली. महिलांनी नियमानुसार प्रवास करण्याचा आपला हक्क असल्याचे सांगूनही चालकाने त्यांचे सामान रिक्षातून बाहेर काढून खाली ठेवले. या अपमानास्पद वागणुकीमुळे दोन्ही महिला व्यथित झाल्या.

त्यानंतर रिक्षा संघटनेच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्यासाठी दुसरी ई-रिक्षा उपलब्ध करून दिली. मात्र, तिथेही त्यांची अडवणूक झाली. माथेरानमध्ये आरटीओच्या नियमानुसार दस्तुरी ते हुतात्मा स्मारक आणि दस्तुरी ते छत्रपती शिवाजी महाराज रोड या मार्गांवर ई-रिक्षा चालवण्यास परवानगी आहे. एका वेळी तीनपेक्षा अधिक प्रवासी नेण्यास बंदी आहे. मात्र, पोलीस आणि नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना 'चौथी सीट' म्हणून नेले जात असल्याचा मुद्दा उपस्थित करत या महिलांनी आपल्यासोबतही तिसरा प्रवासी घ्यावा, अशी मागणी केली. मात्र, रिक्षासाठी अन्य प्रवासी उपलब्ध असतानाही त्यांना तिसरा प्रवासी देण्यात आला नाही. परिणामी, दोन महिलांना तीन प्रवाशांचे पूर्ण भाडे देऊन प्रवास करावा लागला. याबाबत त्यांनी माथेरान श्रमिक रिक्षा संघटनेचे सचिव सुनील शिंदे यांच्याकडे तक्रार केली आहे.

कन्हैया खेर हे स्वतःचेच नियम बनवत असल्याचा माझाही अनुभव आहे. एकदा मला आणि माझ्या आईला घरी सोडण्यासाठी त्यांनी दीडशे रुपये घेतले होते. याबाबत विचारणा केली असता, रिक्षा स्टँडच्या पुढे रिक्षा न्यायची असल्यास नियमानुसार तेवढेच भाडे होते, असे त्यांनी सांगितले. मात्र, असा कोणता नियम आहे, हे मला माहीत नाही. आजारी आणि वयोवृद्ध व्यक्तींना रिक्षा संघटना नेहमीच सहकार्य करते. अगदी रात्री-अपरात्रीही रिक्षाचालक मदतीसाठी तत्पर असतात. मात्र, काही चालकांनी स्वतःचेच नियम बनवून मनमानी करणे थांबवले पाहिजे.

- स्मिता गायकवाड, स्थानिक नागरिक

वन ट्री हिल परिसरातील खराब रस्त्यांमुळे रिक्षा आणताना चालकांना अडचणी येतात, याची आम्हाला जाणीव आहे. या परिसरात दोन शाळा असून, लहान मुलांचीही ये-जा सुरू असते. त्यामुळे प्राधान्याने या रस्त्यांची दुरुस्ती होणे आवश्यक आहे. मात्र, प्रत्येक वेळी रस्त्याचे काम सुरू झाले की ते बंद पाडले जाते. नगराध्यक्ष, नगरसेवक आणि संपूर्ण गावही याबाबत हतबल होऊन शांत बसते, हे संतापजनक आहे. रस्ते दुरुस्त झालेच पाहिजेत; पण तोपर्यंत स्थानिक नागरिकांना रिक्षा सेवा नाकारली जाता कामा नये. प्रथम गावकऱ्यांना रिक्षा मिळालीच पाहिजे.

- कल्पना पाटील, माजी मुख्याध्यापिका, वन ट्री हिल रहिवासी

कारच्या धडकेत स्कूटीस्वाराचा मृत्यू

प्रोफेसर कॉलनी, रायपूर, छत्तीसगड हा त्याचे ताब्यातील वाहन रेनॉल्ट क्वीड कार क्र. सी.जी. ०४/पीडब्ल्यू ४२७३ ही कुहीरे बाजूकडून नागोठणे बाजूकडे घेऊन जात होता. त्याचवेळी तरशेत गावातून रिलायन्स कंपनीत आपल्या ॲक्टीवा मोटारसायकलवरून (क्र. एम.एच. ०६/सी.जे. ७६६८) जाणारे मच्छिंद्र घासे यांना मागील बाजूस कारची जोरात ठोकर लागली. त्यात त्यांना लहान-मोठ्या स्वरुपाच्या गंभीर दुखापती झाल्या. त्यामुळे त्यांना प्रथम रिलायन्सच्या आरोग्य केंद्रात नेण्यात आले. तेथे त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे पाठवण्यात आले. तिथे उपचार करत असताना त्यांचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, कारचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुपारीच्या बागांवर करप्याचा घाला

नसल्याने शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी होत आहे.

रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनारपट्टीच्या भागात भातशेतीबरोबरच नारळ आणि सुपारीच्या बागा मोठ्या प्रमाणात आहेत. अनेक बागायतदारांचे संपूर्ण आर्थिक गणित या पिकांवर अवलंबून आहे. नारळाचे पीक वर्षातून सहा ते दहा वेळा मिळते; मात्र सुपारीचे पीक वर्षातून एकदाच येते. सुपारीचे घडही एकाच वेळी पक्व होत नसल्याने ४५ ते ६० दिवसांच्या अंतराने टप्प्या-टप्प्याने काढणी केली जाते. त्यामुळे झाडांची निगा राखणे अत्यंत महत्त्वाचे असते. नारळाच्या तुलनेत सुपारीतून चांगले उत्पन्न मिळत असल्याने या रोगाच्या प्रादुर्भावाने बागायतदारांची चिंता वाढली आहे.

या समस्येवर मार्गदर्शन करण्यासाठी शुक्रवारी (दि. १३) आक्षी येथे साईकृपा सेंद्रिय शेती गटाची बैठक झाली. यावेळी सुपारी तज्ज्ञ सूर्यवंशी आणि निलेश पाटील यांनी रोगाची संभाव्य कारणे आणि उपाययोजनांची माहिती दिली. गटाचे अध्यक्ष रवींद्र पाटील, उपाध्यक्ष तथा माजी सरपंच नंदकुमार वाळंज, सरपंच रश्मी पाटील, दिलीप वाळंज, गटाचे सदस्य आणि ग्रामस्थ उपस्थित होते. सुपारी तज्ज्ञ सूर्यवंशी यांनी श्रीवर्धनपासून मुरूड आणि अलिबागपर्यंत केलेल्या पाहणीचा अनुभव सांगितला. काही ठिकाणी सिमेंट काँक्रिटच्या बांधकामांमुळे वाढणारी उष्णता, तर काही ठिकाणी पाण्याची कमतरता ही झावळ्या सुकण्यामागील संभाव्य कारणे असू शकतात. मात्र, आक्षी आणि नागावसारख्या निसर्गरम्य भागांतही हीच समस्या दिसत असल्याने केवळ उष्णता किंवा पाण्याची कमतरता हेच कारण नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सुपारीच्या कोवळ्या पानांवरील 'माईट्स' नावाची कीड पानांमधील रस शोषून त्यांना खरवडते. त्यामुळे पाने करपतात. दुसरीकडे करपा रोगामुळे झाडावरील सर्वच पाने सुकण्याची शक्यता असते. यंदा पाऊस उशिरा सुरू झाला आणि नोव्हेंबरअखेरपर्यंत न बरसताच लवकर माघारी फिरला. त्यामुळे रोगाचा प्रादुर्भाव वाढला असण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. नियंत्रणासाठी कीटकनाशक आणि बुरशीनाशकांची पानांवर फवारणी करणे, तसेच बाधित पाने काढून नष्ट करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीत नारळ-सुपारी पीक विमा, गोकृपा अमृत आणि जीवामृत यांसारखी सेंद्रिय खते तयार करण्यापासून त्यांच्या वापरापर्यंत मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीनंतर गटाच्या माध्यमातून सेंद्रिय खतनिर्मितीसाठी आक्षीतील बागायतदारांना २०० लीटरचे ड्रम वाटप करण्यात आले.

निवडक



जिजाऊ संस्थेतर्फे नेत्र तपासणी

कर्जत : कर्जत तालुक्यातील गौरकामथ येथे जिजाऊ संस्थेच्या वतीने मोफत नेत्र तपासणी व आरोग्य तपासणी शिबीर उत्साहात संपन्न झाला. तसेच जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था महाराष्ट्र संस्थापक निलेश सांबरे यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत गौरकामथ येथे मोफत चष्मे वाटप सोमवारी (दि.१६) नोव्हेंबर रोजी, हनुमान मंदिर, गौरकामथ येथे करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराचा तब्बल २४५ नागरिकांनी लाभ घेतला. या शिबिरामध्ये नागरिकांची मोफत आरोग्य व नेत्र तपासणी करण्यात आली. तसेच गरजू नागरिकांना चष्म्यांचे वाटप करण्यात आले. यासोबतच विविध आरोग्यविषयक तपासण्या करून नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी प्रतिभा देशमुख, गणेश ताम्हाणे, ॲड. योगेश देशमुख यांच्या माध्यमातून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले.

अष्टमी गावात भटक्या कुत्र्यांची दहशत

रोहा : रोहा-अष्टमी नगरपरिषदेच्या अष्टमी गावातील संत रोहिदास नगर परिसरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. गेल्या दोन दिवसांत दोन लहान मुलांना कुत्र्यांनी हल्ला करून चावा घेतल्याची घटना घडली आहे. या घटनेत जखमी झालेल्या मुलांवर रोहा उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले. या घटनांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या भागात नगर पालिकेच्या मालकीचे डम्पिंग ग्राउंड आहे. तसेच रेल्वे स्थानक परिसरात भटक्या कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात वावर असून भटक्या कुत्र्यांच्या टोळ्या वस्तीत येत आहेत. त्यामुळे लहान मुलांना घराबाहेर खेळण्यासाठी पाठविणेही धोकादायक बनले आहे. या कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा अशी मागणी रहिवाशांनी केली आहे. नागरिकांच्या तक्रारीनंतर भटक्या कुत्र्यांना पकडण्यासाठी नगरपरिषदेची गाडी पाठविण्यात आली असे प्रशांत कडू यांनी सांगितले.



यशवंत पाटील यांचे निधन

अलिबाग : पिंपळभाट येथील गुरुवनगर येथे राहणारे सेवानिवृत्त मुख्याध्यापक यशवंत कृष्णा पाटील (वय ७४) यांचे नुकतेच निधन झाले. मूळचे ते पेझारी येथील रहिवासी होते. त्यांनी रोहन-महाड, आग्राव आणि सागाव-तळवली, थेरोंडा येथे काम केले. त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन त्यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यांचा दशक्रिया विधी (दि.२२) नोव्हेंबर रोजी ओंकारेश्वर मंदिर, दिवलांग येथे होणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, दोन मुली आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे.



मानिवलीमध्ये प्रतिष्ठापना सोहळा

नेरळ : कर्जत तालुक्यातील गवळी कुटुंबातील कुलदैवत देव्हारा दरवर्षी गावातील एका कुटुंबाकडे जात असतो. सुदैवात खंडेरायांचा देव्हारा सोमवारी (दि.१६) मानिवली गावातील दुसऱ्या कुटुंबाच्या घरी विराजमान झाला. या निमित्ताने संपूर्ण गाव भंडाऱ्याच्या उधळणीचे न्याहून निघाले होते. हरिश्चंद्र गवळी यांच्या घरातील देवाघरातून आता हे कुलदैवत देव्हारा सखा पाटील यांच्या कुटुंबाकडे नेण्यात आला. दरवर्षी बलिप्रतिपदा अर्थात पाडवा या दिवशी कुलदैवत देव्हारा दुसऱ्या एका कुटुंबाकडे जात असतो. रविवारी मानिवली गाव भंडाऱ्याची उधळण सुरु होती. या कुलदैवत देव्हारा हलवण्याच्या कार्याला साठी मुंबईपासून अन्य कुठेही राहणारे गवळी कुटुंब हजर होते.

अवजड वाहनांवर पोलिसांचा दणका

| पनवेल विशेष | प्रतिनिधी |

कळंबोली परिसरातील वाढती वाहतूक कोंडी आणि रस्त्यांवर बेशिस्तपणे उभ्या राहणाऱ्या जड-अवजड वाहनांना आळा घालण्यासाठी कळंबोली वाहतूक शाखेने कारवाईचा धडाका लावला आहे. सप्टेंबर आणि ऑक्टोबर २०२६ या दोन महिन्यांत तब्बल ४ हजार ४१ जड-अवजड वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश कुमार प्रल्हाद सरतापे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

कळंबोली, खांदा कॉलनी आणि कामोठे परिसरात रस्त्यांच्या कडेला तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण होईल अशा ठिकाणी मोठ्या प्रमाणात जड-अवजड वाहने उभी केली जातात. त्यामुळे वाहनचालकांसह पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागतो. अशा वाहनांमुळे अनेकदा



■ दोन महिन्यांत ४ हजार ४१ वाहनांवर कारवाई
■ कर्णकर्कश सायलेन्सरही केले जप्त

गंभीर अपघातही घडले आहेत. नुकत्याच नांदगाव परिसरात रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रेलरला कारने धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात आजोबा आणि नातीचा मृत्यू झाला, तर अन्य चौघे जखमी झाले होते. या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलिसांच्या कारवाईला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

जड-अवजड वाहनांवरील कारवाईबरोबरच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवरही पोलिसांनी कारवाई केली आहे. कर्णकर्कश आवाज करणाऱ्या २९ मोटारसायकलींवर कारवाई करून त्यांचे सायलेन्सर जप्त करण्यात आले आहेत. मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या २४ चालकांवर, हेल्मेट न वापरणाऱ्या २ हजार २५९ दुचाकीस्वारांवर, सीट बेल्ट न लावणाऱ्या ४७४ वाहनचालकांवर, सिग्नल तोडणाऱ्या १ हजार २८० वाहनचालकांवर, तर भरधाव आणि बेदरकारपणे वाहन चालविणाऱ्या २४७ चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय अन्य २ हजार ६८९ प्रकरणांमध्येही दंडात्मक कारवाई करण्यात आली.

केवळ दंडात्मक कारवाई न करता नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण करण्यावरही वाहतूक शाखेने भर दिला आहे. विविध प्रबोधन कार्यक्रमांसह सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हिडिओ आणि छायाचित्रांद्वारे जनजागृती केली जात आहे. २०२६ मध्ये १ हजार ४८० खटले न्यायालयात पाठवून त्यांची निर्गती करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक सरतापे यांनी दिली.

विशेष पथके तैनात

दिवाळी सणाच्या काळातही वाहतूक शाखेने नियोजनबद्ध बंदोबस्त ठेवला होता. पुणे, सातारा, सांगली, सोलापूर तसेच गोवा महामार्गाच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांची संख्या मोठी असल्याने वाहतूक नियंत्रणासाठी विशेष पथके तैनात करण्यात आली होती. प्रत्येक ठिकाणी पाच पोलीस कर्मचारी आणि एका पोलीस उपनिरीक्षकाची नियुक्ती करण्यात आली होती. खांदा कॉलनी, रोडपाली, कळंबोली सर्कल, कामोठे आणि कामोठे जंक्शन येथे विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सणासुदीच्या काळात मोठ्या वाहतूक कोंडीला आळा घालण्यात यश आल्याचे वाहतूक शाखेकडून सांगण्यात आले आहे.

बदलत्या हवामानाचा आरोग्यावर परिणाम

| अलिबाग | प्रतिनिधी |

दुपारी उन्हाचा कडाका आणि पहाटे व रात्री जाणवणारा गारवा, अशा बदलत्या हवामानाचा आरोग्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे विविध रुग्णालये आणि दवाखान्यांमध्ये सर्दी, खोकला, तापाच्या रुग्णांची संख्या वाढत असल्याचे चित्र आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आधीपासून आजार असलेल्या व्यक्तींनी अधिक काळजी घेण्याची गरज निर्माण झाली आहे. मागील तीन-चार दिवसांपासून वातावरणात गारवा वाढला आहे. पहाटे आणि सकाळी थंडी जाणवत असली, तरी दुपारच्या वेळी उन्हाचा चटका बसत आहे. दिवस आणि रात्रीच्या तापमानातील तफावतीमुळे नागरिकांना ताप, अंगदुखी, डोकेदुखी, सर्दी तसेच घसा खवखवण्यासारख्या तक्रारी जाणवत आहेत.

दिव्यांगांसाठी कृत्रिम अवयव वाटपाचे आयोजन

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील मैत्रीबोध परिवार कामतपाडा जांबरुंग आणि मैत्री आदर्श ग्राम या उपक्रमांतर्गत,टाटा ऑटो कॉम्प सिस्टम, पिनॅकल इंडस्ट्रीज पुणे आणि श्री भगवान महावीर विकलांग सहायता समिती यांच्या सहकार्याने कर्जत येथील रॉयल गार्डन येथे दिव्यांगांसाठी मोफत कृत्रिम जयपूर फूट शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या कालावधीत होणार आहे. यामध्ये शारीरिकदृष्ट्या दिव्यांग बांधवांना कृत्रिम अवयव, जयपूर फूट,तसेच व्हीलचेअर, कॅलीपर, कुबड्या, कृत्रिम हात व अन्य सहाय्यक उपकरणांचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. जिल्ह्यासह कल्याण, ठाणे, मुरबाड, खोपोली, लोणावळा, कर्जत, अलिबाग, पेण, पनवेल आणि आजूबाजूच्या गावातील सर्व गरजू दिव्यांगांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे. नोंदणीसाठी मयूर जी ९२२५९२९७६१, वैभव, ७७५८८०६७७८ नितीन ९८६०४९६५९१ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे अवाहन करण्यात आले आहे.

गोड्या पाण्यातील मासेमारी जोरात

| चिरनेर | प्रतिनिधी |

यंदा पावसाळा लवकरच सरला असल्यामुळे नदी, तलाव, ओहळ, शेतातील साठलेले पाणी आदी गोड्या पाण्यातील मासेमारी जोरात सुरू आहे. सध्या गोड्या पाण्यातील विविध मासे मोठ्या प्रमाणात आढळत आहेत. त्यामुळे खवय्यांच्या उड्या चविष्ट गोड्या पाण्यातील मासे तसेच गोड्या चिंबोऱ्यांवर पडत आहेत. हे मासे व चिंबोऱ्या सध्या उरण पनवेलच्या बाजारात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत असल्याने खवय्यांना मेजवानी मिळत आहे.

नदीकिनारी ओहळ, शेतात आणि डोंगर कपारीत सापडणाऱ्या गोड्या पाण्यातील विशेषता: काळ्या पाठीच्या चिंबोऱ्या सध्या



मुबलक मिळत आहेत. पौष्टिक आणि चविष्ट अशा या चिंबोऱ्या खवय्ये चवीने खातात. तसेच नद्या, तलाव, धरण, पाणवठे, ओढे, ओहळ, शेतात साठलेले पाणी अशा गोड्या पाण्यात सापडणाऱ्या माशांची आवक देखील वाढली आहे.

यामध्ये मळे, खवले, कटला, कोलंबी, फंटूस आदी माशांचा समावेश आहे.

मुंबई, नवी मुंबईतील ग्राहक उरण-पनवेलच्या बाजारात येऊन चविष्ट मासे आवर्जून खरेदी करतात. कोळी बांधवांबरोबरच प्रामुख्याने आदिवासी, आगरी समाजातील लोक खूप मेहनतीने हे मासे व चिंबोऱ्या पकडतात. या विक्रीतून त्यांच्या हाती चार पैसे लागतात.

साडेतीनशे ते चारशे रुपयांना सहा चिंबोऱ्या विकल्या जातात. गोड माशांचा शंभर रुपये वाटा तर काही गोड्या पाण्यातील मासे शेपाचशेच्या किलोच्या दराप्रमाणे विकले जातात. अशी माहिती विक्रेत्या आदिवासी बांधवांनी दिली आहे.

मॉडेल स्कूल कार्यक्रमाचा समारोप

| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |

पर्यावरण संवर्धनाची सवय विद्यार्थ्यांमध्ये रुजवून शाश्वत विकासाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या टाइड संस्थेच्या मॉडेल स्कूल कार्यक्रमाचा स्टेकहोल्डर शोकेस ॲण्ड रिकग्निशन इव्हेंट २०२६ उरण येथे उत्साहात पार पडला. उरण आणि पनवेल तालुक्यांतील २० जिल्हा परिषद शाळांमध्ये चार वर्षे राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा यावेळी आढावा घेण्यात आला.

टेक्नॉलॉजी इन्फॉर्मेटिक्स डिझाइन एन्डेव्हर संस्थेने सोसायटी जनरलच्या सहकार्याने जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाच्या मल्टिपर्पज हॉलमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये उरण तालुक्यातील १२, तर पनवेल



■ २० जिल्हा परिषद शाळांचा गौरव

तालुक्यातील आठ शाळांचा समावेश होता.

या कार्यक्रमांतर्गत शाळांमध्ये सौरऊर्जा प्रणाली, पावसाच्या पाण्याचे संकलन, कंपोस्ट खतनिर्मिती, शालेय परसबाग, ऊर्जा कार्यक्षम एलईडी दिवे आणि बीएलडीसी पंखे असे पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्यासाठी इको-क्लबच्या माध्यमातून विविध उपक्रम हाती घेण्यात आले.

डॉ. श्रीदर बाबू यांनी विद्यार्थ्यांचे नेतृत्व केले. या उपक्रमांचे यश विद्यार्थी, शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन आणि स्थानिक प्रशासनाच्या एकत्रित प्रयत्नांमुळे शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात २० शाळांमधील विद्यार्थ्यांनी तयार केलेली पर्यावरणविषयक प्रतिकृती आणि प्रकल्प प्रदर्शित करण्यात आले.

यावेळी रंजना वास्कर, महेश म्हात्रे यांच्यासह शिक्षण विभागाचे अधिकारी, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आदिवासी महिलांना साडीचोळी भेट

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात आदिवासी भागासाठी उपक्रम राबवणाऱ्या राधा मीरा ट्रस्टकडून दिवाळीनिमित्त ४०० हुन अधिक आदिवासी महिलांना साडीचोळी तसेच किरणा जिन्नस देण्यात आल्या. ट्रस्टचे अध्यक्ष भरत मेहरा यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला.

आदिवासी भागातील गिर्याचीवाडी, झेंडेवाडी, उंबरवाडी येथील २५० महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले. तसेच वांगणी येथे दिवाळीनिमित्त अंध अपंग व्यक्तींना जीवनावश्यक वस्तूचे वाटप करण्यात आले. यावेळी २०० अंध अपंग व्यक्तींनी लाभ घेतला. दिवाळीनिमित्त अंध अपंगांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केल्याने त्यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. या कार्यामुळे आदिवासी व अंध अपंग व्यक्तींच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळाला. याप्रसंगी राधा मीरा चेरीट्रबल ट्रस्टचे नाशिर शेख, ॲड. महेश आगे आदी उपस्थित होते.

मरवडे परिवाराचा कुलदैवत उत्सव साजरा



| खांब | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील क्षेत्र तळवलीतर्फे अष्टमी येथील मरवडे परिवाराचे श्रद्धास्थान असलेल्या कुलदैवत उत्सव भक्तीभावाने साजरा करण्यात आला. या उत्सवातंर्गत महाआरती, कोकण दिंडी वारकरी संप्रदाय व खांब पंचक्रोशी तसेच ग्रामस्थ मंडळांचे सामुदायिक हरिपाठ, आदी धार्मिक कार्यक्रम करण्यात आले होते. दिनेश कडव यांनी आपल्या किर्तनरूपी सेवेप्रसंगी कुलदेवतेच्या उपासनेचे महत्व सांगितले. याप्रसंगी खांब पंचक्रोशीसह रोहा तालुक्यातून मोठ्या संख्येने उपस्थिती नोंदवून विविध प्रकारच्या कार्यक्रमांचा आस्वाद घेतला.

शिरढोणमध्ये टेलिस्कोपिक निरीक्षण

■ खगोलशास्त्राची आवड जोपासण्याचा उपक्रम

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

मुलांमध्ये विज्ञान, खगोलशास्त्र आणि अवकाशाविषयी कुतूहल निर्माण करण्यासाठी शिरढोण येथे विनामूल्य आकाशदर्शन आणि दुर्बिणीतून खगोलीय निरीक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. मोबाईल आणि टीव्हीच्या विश्वात रमणाऱ्या मुलांना प्रत्यक्ष आकाशातील ग्रह, तारे आणि खगोलीय घडामोडींची ओळख व्हावी, या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या उपक्रमांतर्गत २१ नोव्हेंबर आणि १२ डिसेंबर रोजी सायंकाळी ५.४५ वाजता शिरढोण येथे आकाशदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. आधुनिक दुर्बिणीच्या माध्यमातून



अवकाशाचे निरीक्षण करण्याचा अनुभव नागरिकांना घेता येणार आहे. विद्यार्थ्यांसाठी हा अनुभव ज्ञानवर्धक आणि कुतूहल वाढवणारा ठरणार आहे. या निरीक्षणासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नसून इच्छुकांनी नाव, पत्ता आणि वय ही माहिती व्हॉट्सपद्वारे ९९६७५८४५५४ या क्रमांकावर पाठवून नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. पुस्तकातील विज्ञान प्रत्यक्ष अनुभवातून समजून घेण्याची संधी मुलांना मिळणार असल्याने पालकांनी आपल्या मुलांना या उपक्रमात सहभागी करून घ्यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- ८७८८०२१५१०
- नागाव येथील हॉटेलसाठी कर्मचारी भरती रिक्त पदे : १) नाईट शिफ्टसाठी पुरूष कर्मचारी २) रिसेप्शनिस्ट ३) किचन हेल्पर (महिला) ४) मोरी कामगार ५) कॅप्टन (रेस्टॉरंट) ६) वेटर ७) ऑलराऊंडर कुक (स्वयंपाकी) कामाचे ठिकाण : नागाव, अलिबाग इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा. मो. ७५५९१८४६१२
- जमिन तसेच, जुने/नवीन घर विकत/भाड्याने पाहिजे. 7378480151
- पाहिजेत-अलिबागमध्ये ऋतुजा इन्फ्रास्टकचर्स या कंपनी करीता टॅली/जी.एस.टी. कामासाठी मुलगा/मुलगी पाहिजेत संपर्क-९८२३४९२६२६/७९९८६१९१९९१ विद्यानगर-अलिबाग
- अलिबाग बिगस्प्लॅश हॉटेलमध्ये रिसेप्शनिस्ट, वेटर, कॅप्टन, हाउसकीपिंग या पदांसाठी उमेदवार पाहिजेत संपर्क : 8483999229
- दुकानगाळा भाड्याने देणे आहे विक्री करणे आहे २० गुंठे जागा अलिबाग पासून २ किमीवर ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

तीन ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर उभारणी | सीएसआर सहभागातून राबविणार प्रकल्प

पनवेलमध्ये उभारणार 'पिंक टॉयलेट्स'

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

नोकरी, व्यवसाय, शिक्षण आणि अन्य कामांसाठी दररोज घराबाहेर पडणाऱ्या महिलांना सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतागृहांची सुविधा मिळावी, यासाठी पनवेल महानगरपालिकेने आधुनिक 'पिंक टॉयलेट्स' उभारण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे. महिलांच्या सुरक्षिततेसह आरोग्य आणि स्वच्छतेला प्राधान्य देणाऱ्या या उपक्रमांतर्गत सुरुवातीला तीन ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर पिंक टॉयलेट्स उभारण्यात येणार आहेत. त्यानंतर शहरातील गर्दीच्या २५ ते ५० ठिकाणी ही



सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.

सुरुवातीला मँगो गार्डन, कळंबोलीतील के. एल. ई. कॉलेजजवळ, खारघरमधील हिरानंदानी बसथांबा येथे पिंक टॉयलेट्स उभारण्याचे प्रस्तावित आहे. प्रायोगिक टप्प्यातील या उपक्रमाला मिळणारा प्रतिसाद आणि व्यवस्थापनाचा अनुभव लक्षात घेऊन पुढील ठिकाणांची निवड केली जाणार आहे.

स्वच्छतागृहांमध्ये भारतीय पद्धतीची तसेच स्वयंचलित फ्लशयुक्त शौचालये, सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करून देणारी यंत्रणा आणि वापरलेल्या नॅपकिनची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी इन्सिनरेटरची सुविधा असेल. स्तनपान करणाऱ्या मातांसाठी स्वतंत्र हिरकणी कक्ष उभारण्याची संकल्पनाही या प्रकल्पात आहे. त्यामुळे लहान बाळांसह प्रवास करणाऱ्या महिलांना मोठा दिलासा मिळू शकतो.

महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे, आपत्कालीन मदतीसाठी पॅनिक बटण आणि महिला सुरक्षा कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव आहे. तसेच सौरऊर्जेचा वापर, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी बोअरवेलची सुविधाही नियोजित आहे. आता प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी प्रशासनाकडून पुढील कार्यवाही कधी सुरू होते, याकडे महिलांचे लक्ष लागले आहे.

गर्दीच्या ठिकाणांना प्राधान्य

पहिल्या टप्प्यातील तीन ठिकाणांनंतर पनवेल, खारघर, मानसरोवर आणि खांदा कॉलनी रेल्वे स्थानक परिसर, मुख्य बाजारपेठा, आठवडी बाजार, बसथांबे, उद्याने, जॉगिंग ट्रॅक आणि शासकीय कार्यालयांच्या परिसरात पिंक टॉयलेट्स उभारण्याचा विचार आहे. यासाठी गर्दीचे प्रमाण आणि महिलांची वर्दळ लक्षात घेऊन २५ ते ५० ठिकाणांची निवड केली जाणार आहे.

जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे दळवी खरोशी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिन मिळकतीपैकी ०-७७-५० (हे.आर) शेतजमिन मिळकत सौ. मेघा रसिक देसाई, राहणार आझाद नगर, मुंबई यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरित झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील सौ.मेघा रसिक देसाई यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु.पैसे)
दळवी खरोशी, ता.अलिबाग.	८	१-७६-७० ०-०४-५० पो.ख. १-८१-२० एकूण	२३-३७

सदरील मिळकतीपैकी सौ.मेघा रसिक देसाई, यांच्या मालकीची ०-७७-५०(हे.आर), ही शेतजमिन मिळकत,

अलिबाग,
दिनांक १६/११/२०२६.

सही/-
(ॲड. संजय म.भगत)
हिराबाग सोसायटी, अे विंग,
टिळक रोड, अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील वर्णन केलेली जमीन मिळकत त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे किहीम, ता.अलिबाग, जि. रायगड येथील

मालकाचे नाव	गट नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु. पै.
विवेकानंद गजानन पाटील	सर्वे नं./ गट नं.१५८	०-२३-५०	२.१९

सदरची जमिन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्येक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असुन ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्गंभुत हक्क हितसंबधासह आमचे अशिल यांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकित दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी जाहीर नोटिस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि. १६/११/२०२६.

श्री. समिर स.भालेकर
ॲडव्होकेट
पत्ता.मु.पो. आपटा, ता.पनवेल
जि. रायगड. ४१०२०७
नं. ९७६६३४७१४४

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती काशिनाथ गडमुळे रा. १११, शोभा सदन, अभिलाषा बिल्डींग जवळ, श्रीबाग नं. २, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र.व उपविभाग नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू. पैसे)
नागाव	१४०२	०-०९-१०	०.७२
ता. अलिबाग	१२७९	०-२४-१०	२.३७

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा अथवा गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वांस कळावे.

सही/-
ॲड. आर.बी. कोसमकर
चिरायु, ब्राह्मण आळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

अलिबाग
दि. १६-११-२०२६

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या शेती मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक श्री.विजय शांतीलाल जैन इतर १ रा.मुळशी पुणे यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे जांभुळपाडा, ता. सुधागड, जि. रायगड

सर्व्हे नं.	क्षेत्र हे आर	आकार रू.पैसे
४२	७-४१-००	२-००

या एकूण क्षेत्रापैकी मिळकत मालकाचे क्षेत्र ०-२०-०० हे.आर

वरील शेत मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : १७/११/२०२६

सही / -
ॲड. समिर अनंत आंबोलकर
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता.सुधागड, जि.रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

दिनांक : १७ नोव्हेंबर २०२६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावरून नमुद असलेल्या मालकाकडून आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मौजे- हेदवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.-आर.-पॉ.	आकार रूपये	आकार पैसे
१) माधव हरी जोशी २) इंदुबाई परशुराम कोळंबे	१६	२	०-३२-००	०	२२

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही/-
कार्यालयीन पत्ता : मु.पो. कशेळे ॲड. भुपेश तानाजी पेमारे
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर मो.नं. ९१५८२७७७२८
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१ दिनांक : १७/११/२०२६

जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल फय्याज गुलामसाहेब जुवारी यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक सुफियान अब्दुल हमीद लकडावाला यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मौजे. साळोख तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
४७	४/अ	०-५८-१०	८-८७

यापैकी सुफियान अब्दुल हमीद लकडावाला यांचे मालकीची व हिश्याची ०-३८-१० हे. आर. क्षेत्राची मिळकत

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. १७/११/२०२६.

ॲड. नरेश रामदास आहीर.
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड- ४१०१०१.
मो. - ९३२५०६००३७/९०११२९२९८७.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली जमीन मिळकत सिद्धार्थ कृष्णा सकपाळ, कल्पना सिद्धार्थ सकपाळ आणि स्नेहल सिद्धार्थ सकपाळ यांच्याकडून आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

जमीन मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
खानाव ता. अलिबाग जि. रायगड	६६/४	०-६१-२० पो.ख. ०-०३-०० एकूण ०-६४-२० पैकी ०-४०-००	९.५६

वर नमूद केलेल्या सामाईक जमीन मिळकतीपैकी ०-४०-०० हे.आर. जमीन मिळकत व त्यामध्ये बांधण्यात आलेली ग्रुप ग्रामपंचायत खानाव हद्दीतील घर मिळकत या दोन्ही मिळकती या नोटीसीचा विषय आहेत.

तरी वर नमूद मिळकतीबाबत कुणाचेही ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकती निर्वेध व बोजाविरहीत आहेत. असे समजून इतर कोणाचाही कायदेशीर हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक आमच्या अशिलांच्या हक्कात सोडून दिलेले आहे, असे समजून व कायदेशीर बाबींची पूर्तता करून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १६/११/२०२६

सही/-
ॲड. जान्हवी म्हात्रे
०५, श्रृती सारंग सहकारी सोसायटी
युनियन बँकेसमोर, ब्राह्मण आळी
ता. अलिबाग, जि. रायगड

दि. १६/११/२०२६

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेल्या मिळकतींचे विद्यमान मालक सौ.स्वाती संदिप दवटे यांच्याकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतींचे वर्णन

मौजे	नगर भुमापन क्रमांक	क्षेत्र (चौ.मी.)	धारणाधिकार
आंबेपुर, ता.अलिबाग	२३१	३८८०.३०	अ

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी सौ. स्वाती संदिप दवटे यांच्या हिश्याचे क्षेत्र ३००.०० चौ.मी. ही मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ०७ (सात) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

सही/-
ॲड. मानस सुधाकर पाटील
मु. आंबेघर, पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ७७४३८०९६५३

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीशीने सर्वांना कळविणेत येते की, आमचे अशील श्री. कमलाकर रघुनाथ खडे, रा.उक्रुळ, ता.कर्जत, जि.रायगड यांचे मालकीची मौजे वावळोली, ता.कर्जत, जि.रायगड येथे सर्व्हे नंबर १०/१/अ क्षेत्र हे. आर. पॉ. ०-५२-६० गुंठे या मिळकतीबाबत १. अंकुश गोपाळ दुर्गे, रा.नेवाळी, ता.कर्जत, जि.रायगड व २. संतोष कोंडु धुळे रा.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड या दोघांनी आमचे अशिलाची फसवणुक करून सदर मिळकतीचे बेकायदेशिररित्या रजिस्टर्ड खरेदीखत त्यांचे लाभात करून गुन्ह्याचे कृत्य केलेले आहे, परंतु आमचे अशिलांनी सदर मिळकतीची त्यांना विक्री केलेली नाही व त्यांचे कडुन त्यासाठी कोणताही मोबदला स्विकारलेला नाही. परंतु आता केवळ सदर मिळकत ७/१२ चे उताऱ्यावर त्यांची नावे आहेत याचा गैरफायदा घेऊन वरील नमुद दोघे सदर मिळकत अन्य त्रयस्थ व्यक्तींना विकणेचे खटपटीत आहेत. तरी सदर मिळकतीबाबत कोणीही १. अंकुश गोपाळ दुर्गे व २. संतोष कोंडु धुळे अथवा त्यांचे अखत्यारी यांचेबरोबर कोणतेही प्रकारचा व्यवहार करू नये व याउपरही कोणताही व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ता. १७ नोव्हेंबर २०२६

सौ.पुजा एस.कोंडेकर
ॲडव्होकेट व नोटरी
ऑफीस : ''गणेश अपार्टमेंट'' तळ मजला,
कोतवाल नगर, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं. ९४२२०७१९८६
मो. नं. ९१११२३४०८०८

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे गौरकामत, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक पुनम विजय कनोजे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे.आर.पॉ	आकार रु. पै.
१७	१/अ	एकुण क्षेत्र ०-३३-०० पैकी विकत देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०-१६-००	२-१८

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १७/११/२०२६

ॲड. समीर आर. सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-गाळा नं.०९,कोर्ट व्ह्यू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड मो.नं ९१५८३१३७३३

दिनांक : १७ नोव्हेंबर २०२६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मौजे - कामतपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.- पॉ.	आकार रुपये	आकार पैसे
१) कांतीलाल तुळशीराम कोकणे २) विश्वास विष्णु मोरे	५६	७	०-०३-००	०	०३

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही / -
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, ॲड. अशोक मारुती कोकणे
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, मो.नं. ७०५८७७८६५३
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१ दिनांक :-१७/११/२०२६

महाड नगर परिषद, महाड
छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय भवन,
महाड जि. रायगड. पिन : ४०२३०१
दुरध्वनी व फॅक्स क्रमांक : ०२१४५-२२२३७४ Email : mahadnagarpalika@gmail.com
मुख्याधिकारी (दुरध्वनी : ०२१४५-२२२२५५ coud.mahad@maharashtra.gov.in
जावक क्र.म.न.प./बांधकाम विभाग/१५९३/२०२६-२०२७ दिनांक :१३/११/२०२६

जाहीर ई निविदा सूचना सन २०२६-२७

महाड नगरपरिषद हद्दीतील खालील कामांसाठी ऑनलाईन पद्धतीने टक्केवारी दराच्या ई- निविदा मागविण्यात येत आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम रु.
०१.	महाड नगरपरिषद हद्दीत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियाना अंतर्गत शहरात (अ) मराठी शाळांची दर्जोन्नती/सुधारणा विषयक, (ब) सार्वजनिक आरोग्य विषयक, (क) पर्यावरण विषयक, व (ड) पर्यटन विषयक कामे करणे. (दुसरी मागणी)	रु.८२,३६,१७४/-
०२.	महाड नगरपरिषद हदीतील कुंभार आळी येथील महिकावती मंदीर शेजारी गार्डन व खेळणी बसविणे (भाग-१)	रु.२०,४७,२६३/-

तरी सदर कामांसाठी इच्छुक निविदा धारकांनी त्यांच्या निविदा नगरपरिषदेच्या अटी व शर्तीस अधीन राहून http://www.mahatenders.gov.in येथे ऑनलाईन पद्धतीने सादर कराव्यात. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक २५/११/२०२६ अशी राहील.

सही/-
(धनंजय कोळेकर)
मुख्याधिकारी
महाड नगरपरिषद, महाड

सही/-
(सुनिल वसंत कविस्कर)
नगराध्यक्ष
महाड नगरपरिषद, महाड

PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the general public that our client has decided to purchase the property described herein below from the present owners Mr. Keval Gurunath Mhatre, on permanent ownership basis.

Although the present owners have assured that the said property is free from all encumbrances, if any person, institution, bank, or authority has any claim, right, title, interest, share, charge, lien, lease, gift, will, mortgage, possession, inheritance, easement, or any other right of whatsoever nature in respect of the said property, they are hereby required to inform the undersigned Advocate for the purchaser in writing along with supporting documentary evidence within 15 (Fifteen) days from the date of publication of this notice.

If no such claim or objection is received within the stipulated period, the property shall be deemed to be free from all encumbrances and our client shall proceed to complete the purchase transaction. Any claims or objections received thereafter shall not be entertained and shall not be binding upon our client.

Description of the Property

Village	Bhumapan and Upvibhag No.	Area [H.R.P]	Assessment [Rs]
Chinchoti, Tal-Alibaug	2/4	0-02-80 Pot-Kharaba 0-01-50 Total Area 0-04-30	0-52

Alibag
Date: 17/11/2026

Adv. Samiksha Siddharth Shembekar
District Court, Raigad-Alibag
Address: At. Lonare, Post. Raigad-Alibag
Mobile No - 7719907261

जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील वर्णन केलेली जमीन मिळकत त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे किहीम, ता.अलिबाग, जि. रायगड येथील

मालकाचे नाव	गट नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
अमृता विवेकानंद पाटील	सर्वे नं./ गट नं. १५९	०-२५-००	२.३७

सदरची जमिन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असुन ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्गंभुत हक्क हितसंबधासह आमचे अशिल यांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकित दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी जाहीर नोटिस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१६/११/२०२६

ॲडव्होकेट
श्री. समिर स.भालेकर
पत्ता.मु.पो. आपटा, ता. पनवेल
जि. रायगड. ४१०२०७
नं. ९७६६३४७१४४

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली मौजे चिंचोटी, ता.अलिबाग जिल्हा रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.केवळ गुरुनाथ म्हात्रे यांसकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकाने दिलेला आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची त्याची खातरजमा करण्याकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र	आकार (रू.पै)
चिंचोटी, ता.अलिबाग	२/४	०-०२-८० पो.ख ०-०१-५० एकुण क्षेत्र ०-०४-३०	०.५२

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्येयेणेचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १५ (पंधरा) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी
कळावे.

अलिबाग,
दिनांक १७/११/२०२६

सही /-
ॲड. समिक्षा सिद्धार्थ शेंबेकर,
जिल्हा न्यायालय, रायगड
पत्ता मु. लोणारे, पो. थळ,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.७७१९९०७२६१

जाहीर नोटीस

दि. १६/११/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक १) श्री. प्रमोद विठोबा पाटील, २) सिद्धेश नरेंद्रकुमार पाटील यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

-: मिळकतीचे वर्णन :-

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे. आर)	आकार
पेझारी ता. अलिबाग	७३/२	०-५४-८० पो.ख. ०-०३-८० एकुण ०-५८-६०	५.३७

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी लिहून देणार प्रमोद विठोबा पाटील व सिद्धेश नरेंद्रकुमार पाटील यांच्या हिश्यातील क्षेत्र ०-३९-६० हे.आर., पो.ख. ०-०३-०० हे.आर., एकुण क्षेत्र ०-४२-६० हे. आर., आकार ३.८८ रू.पै या मिळकतीपैकी क्षेत्र ०-२१-७० हे. आर. ही मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ०७ (सात) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित म

निवडक

हर्षल पटेल गुजरातच्या ताफ्यात

मुंबई : आयपीएल २०२७ च्या हंगामापूर्वी खेळाडूंच्या



अदलाबदलीला वेग आला असून, सनरायझर्स हैदराबादने अनुभवी वेगवान गोलंदाज हर्षल पटेलला गुजरात टायटन्सकडे पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. या व्यवहारात गुजरात टायटन्स हर्षलला ४ कोटी रुपयांमध्ये आपल्या संघात सामील करून घेणार आहे.विशेष म्हणजे, २०२५च्या मेगा लिलावात हैदराबादने त्याच्यासाठी मोजलेल्या ८ कोटी रुपयांच्या तुलनेत ही रक्कम निम्मी आहे. दोन्ही संघांमध्ये रोख रकमेच्या स्वरूपात हा व्यवहार निश्चित झाला आहे. या व्यवहारानुसार गुजरात टायटन्सच्या आगामी लिलावातील पर्समधून ४ कोटी रुपये वजा केले जाणार आहेत.३५ वर्षीय हर्षल हा आयपीएलमधील अनुभवी गोलंदाज असून त्याने आपल्या कारकिर्दीत दोन वेळा पर्पल कॅप पटकावली आहे. २०२१ मध्ये बेंगळुरूकडून खेळताना त्याने ३२ विकेट्स घेतल्या होत्या. त्यानंतर २०२४ मध्ये पंजाबकडून खेळताना २४ विकेट्स मिळवत पुन्हा सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज ठरला.२०२५ च्या मेगा लिलावात हैदराबादने त्याला ८ कोटी रुपये मोजून संघात घेतले होते.

रजत पाटीदारचे दणदणीत शतक

मुंबई : रजत पाटीदारने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२६



मध्ये शतकी खेळी साकारत इतिहास घडवला आहे. रजत पाटीदारने चौकार-षटकारांची आतिषबाजी करत धावांचा डोंगर उभारला. मध्यप्रदेशचं नेतृत्त्व करताना रजत पाटीदारने केलेली ही खेळी सय्यद मुश्ताक अली स्पर्धेतील ऐतिहासिक खेळी ठरली. रजतने अशी कामगिरी केली आहे, जी आजवर कोणत्याच खेळाडूला जमलेली नाही. सध्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी टी-२० स्पर्धेचे सामने सुरू आहेत. मध्य प्रदेश आणि आसाम यांच्यातील सामन्यात मध्य प्रदेशने प्रथम फलंदाजी केली. सुरुवातीलाच एक विकेट गमावल्यानंतर, संघाचं नेतृत्व करणारा रजत पाटीदार फलंदाजीसाठी मैदानात उतरला. त्याने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेत अवघ्या २५ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केलं. रजतने चौकार आणि षटकारांची बरसात करत झटपट अर्धशतक केल्यानंतरही आपली जोरदार फटकेबाजी सुरू ठेवली. रजतने केवळ ४१ चेंडूंत आपलं शतक पूर्ण केलं आणि शतक गाठल्यानंतरही त्याने आपला शानदार फॉर्म कायम ठेवला.

भारत अंतिम फेरीत

ढाका : भूतानने उत्तरार्धात जोरदार झुंज दिली, मात्र भारताने



संयम आणि अनुभवाच्या जोरावर २-१ असा विजय मिळवत सॅफ चॅम्पियनशिप फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. या विजयामुळे भारताचे विक्रमी दहाव्या विजेतेपदाचे स्वप्न कायम आहे. भारताकडून विष्णू याने नवव्या मिनिटाला, तर कर्णधार छिंगलेन्सना सिंग कोनशाम याने २७व्या मिनिटाला गोल केला. भूतानच्या किंझांग ताशी तोबदेन याने ४८व्या मिनिटाला गोल करत सामन्यात रंगत निर्माण केली. मात्र, उर्वरित वेळेत भारताने आघाडी कायम राखली. गतविजेत्या भारताचा अंतिम सामना १७ नोव्हेंबरला बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यातील दुसऱ्या उपांत्य सामन्यातील विजेत्याशी होणार आहे.

भारतात रंगणार वर्ल्ड कपचा थरार

१२ स्पर्धांच्या तारखा जाहीर, चाहत्यांसाठी पर्वणी; आयसीसीची मोठी घोषणा

| मुंबई | प्रतिनिधी |

भारतीय क्रिकेट संघाचं २०२३ साली वनडे वर्ल्ड कप जिंकण्याचं स्वप्न अधुर राहिलं. ऑस्ट्रेलियाने अंतिम सामन्यात पराभूत केल्याने भारताला उपविजेता म्हणून सराधान मानावं लागलं. मात्र त्यानंतर भारताने कमाल केली. भारताने सलग २ टी २० वर्ल्ड कप, आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी, अंडर १९ मेन्स आणि वुमन्स वर्ल्ड कप ट्रॉफी जिंकण्याची कामगिरी केली. भारतीय पुरुष, महिला आणि अंडर १९ संघाने दबदबा निर्माण केला. मात्र त्यानंतरही भारतीय चाहत्यांना आता आगामी २०२७ च्या वनडे वर्ल्ड कपची प्रतीक्षा आहे.

आयसीसीने आगामी वर्ल्ड कप स्पर्धेचं वेळापत्रक ऑक्टोबर महिन्यात जाहीर केलंय. त्यानुसार प्रत्येक संघाने जुळवाजुळव करण्यास तयारी सुरु केली आहे. अशात



आता क्रिकेट वर्तुळातून आगामी १२ स्पर्धांच्या मुख्य तारखा जाहीर केल्याबातमी समोर आली आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने रविवारी १५ नोव्हेंबरला आयसीसी च्या आगामी १२ स्पर्धांच्या मुख्य तारखा जाहीर केल्या आहेत. त्यानुसार २०२८ ते २०३५ या ७ वर्षांदरम्यान या १२ आयसीसी स्पर्धांचा थरार रंगणार आहे. या १२ स्पर्धांमध्ये मेन्स वर्ल्ड कप,चॅम्पियन्स ट्रॉफी आणि वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप स्पर्धेच्यामुख्यतारखाजाहीरकरण्यात आल्या आहेत. या १२ पैकी काही आयसीसी स्पर्धेच्या यजमानपदाचा मानही भारताला देण्यात आला आहे.

भारतात २ आयसीसी स्पर्धा होणार

भारताला २०२८ ते २०३५ दरम्यान जाहीर करण्यात आलेल्या एकूण १२ पैकी २ स्पर्धांच्या यजमानपदाचा मान मिळाला आहे. आयसीसीने दिलेल्या माहितीनुसार, भारतात २०२९ साली चॅम्पियन्स ट्रॉफी आणि वनडे वर्ल्ड कप २०३१ स्पर्धेचं आयोजन होणार असल्याचं निश्चित आहे. विशेष म्हणजे या दोन्ही स्पर्धांचं आयोजन हे ऑक्टोबर ते नोव्हेंबर दरम्यान करण्यात आलं आहे. भारतात प्रामुख्याने ऑक्टोबरनंतर पाऊस नसतो. पावसामुळे आतापर्यंत अनेक आंतरराष्ट्रीय सामने रद्द करावे लागल्याचा इतिहास आहे. तसंच सामना पावसामुळे रद्द झाल्याने संपूर्ण समीकरण बदलतं. भारतात या स्पर्धांचं आयोजन ऑक्टोबर ते नोव्हेंबर दरम्यान करण्यात आल्याने पावसाची शक्यता फार कमी असणार आहे. त्यामुळे सामन्यात व्यत्यय येणार नाही, जी चाहत्यांसाठी दिलासादायक बाब असणार आहे.

भारताला २०२३ साली शेवटच्या एकदिवसीय वर्ल्ड कप स्पर्धेच्या यजमानपदाचा मान मिळाला होता. आयसीसीची इंडोनेशियात काही दिवसांआधी महत्त्वाच्या स्पर्धांबाबत बैठक पार पडली. या बैठकीनंतर आयसीसीकडून पुरुष क्रिकेट स्पर्धांच्या तारखा निश्चित करण्यावर एकमत झालं. त्यानंतर आता या तारखा जगजाहीर करण्यात आल्या आहेत.

आयसीसी स्पर्धेच्या यजमानपदाचा मान मिळणं ही प्रत्येक क्रिकेट बोर्डासाठी अभिमानाची बाब असते. आपल्यालाच तो मान मिळायला हवा, यासाठी प्रत्येक क्रिकेट बोर्ड आग्रही असतो. मात्र सर्वांना समसमान संधी मिळावी, यासाठी आयसीसी क्षेत्रानुसार यजमानपद कुणाला द्यायचा हे ठरवतं, जेणेकरुन त्या त्या देशातील चाहत्यांना सामने पाहण्याची संधी मिळावी. तसंच रोजगारनिर्मिती होण्यासह क्रिकेटचा आणखी विकास व्हावा.भारतात २०२९ साली ९ ते २८ ऑक्टोबर दरम्यान चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा खेळवण्यात येईल. तर वनडे वर्ल्ड कप २०३१ स्पर्धेचं आयोजन हे ९ ऑक्टोबर ते २३ नोव्हेंबर दरम्यान करण्यात आलं आहे. या स्पर्धेसाठी बांगलादेशला सहयजमानपद देण्यात आलं आहे.

देशातील दिग्गज स्क्वॉशपटू मुंबईत दाखल

| मुंबई | प्रतिनिधी |

देशातील आघाडीचे स्क्वॉशपटू ८२व्या राष्ट्रीय स्क्वॉश स्पर्धेसाठी मुंबईत एकत्र येणार आहेत. एचसीएल प्रायोजित ही प्रतिष्ठित स्पर्धा १६ ते २२ नोव्हेंबरदरम्यान वांद्रे पश्चिम येथील कार्टर रोडवरील ऑटर्स क्लबमध्ये आयोजित करण्यात आली आहे. देशभरातील अनुभवी आणि उदयोन्मुख खेळाडूंच्या सहभागामुळे या स्पर्धेत विजेतेपदासाठी चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे.

स्क्वॉश रॅकेट्स फेडरेशन ऑफ इंडिया आणि ऑटर्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने या



स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी एकूण ३९४ प्रवेशिका प्राप्त झाल्या आहेत. यावरून देशात स्क्वॉश खेळाची वाढती लोकप्रियता आणि खेळाडूंची गुणवत्ता अधोरेखित होत आहे. यंदाच्या स्पर्धेत पुरुष गटात आशियाई क्रीडा स्पर्धेतील वैयक्तिक रौप्यपदक विजेता अभय सिंग अव्वल मानांकित खेळाडू म्हणून सहभागी होणार आहे.

जय शहा दुसऱ्यांदा आयसीसीच्या चेअरमनपदी

| मुंबई | प्रतिनिधी |




जय शहा सलग दुसऱ्यांदा इंटरनॅशनल क्रिकेट कौन्सिलचे अध्यक्ष झाले आहेत. सलग दोन वेळा हे पद भूषवणारे ते पहिले भारतीय ठरलेत. इंडोनेशियातील बाली येथे झालेल्या बैठकीत संचालकांनी जय शहा यांना पुन्हा अध्यक्ष बनवण्याचा प्रस्ताव दिला होता. जय शहा २०२४ मध्ये पहिल्यांदा आयसीसीचे अध्यक्ष झाले होते.

महाराष्ट्र राज्य खुल्या बॅडमिंटन स्पर्धा

युविका बजाजला स्पृहा जोशीचा धक्का

| मुंबई | प्रतिनिधी |

बॉम्बे जिमखाना प्रस्तुत योनेक्स सनराइज बॉम्बे जिमखाना महाराष्ट्र राज्य खुल्या बॅडमिंटन स्पर्धा २०२६ मध्ये मुंबई उपनगरच्या स्पृहा जोशीने अव्वल मानांकित युविका बजाजला पराभूत करत मुलींच्या १९ वर्षांखालील गटाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.



स्पृहा जोशीने उपांत्य फेरीत शानदार खेळ करत अव्वल मानांकित युविका बजाजला ९-१५, २०-१८, १५-९ असे पराभूत केले. पहिला गेम गमावल्यानंतर स्पृहाने दुसऱ्या गेममध्ये महत्त्वाचे गुण वाचवत २०-१८ अशी बाजी मारली. निर्णायक गेममध्ये तिने प्रतिस्पर्धी खेळाडूला संधी न देता विजय मिळवला. अंतिम फेरीत स्पृहाचा सामना ग्रेटर मुंबईच्या अन्विशा घोरपडे हिच्याशी होणार आहे. अन्विशाने पुण्याच्या शर्वरी वारवंटकरला १५-११, १५-१० असे पराभूत करून अंतिम फेरी गाठली. हर्षितने मुलांच्या १९ वर्षांखालील एकेरीच्या उपांत्य फेरीत इशान वानखेडेचा १५-१३, १५-१० असा पराभव केला. त्यानंतर पुरुष एकेरीत अव्वल मानांकित विनय पाटीलला ११-१५, १६-१४, १५-३ असे नमवत अंतिम फेरीत प्रवेश केला. दुसऱ्या गेममध्ये महत्त्वाच्या क्षणी विजय मिळवत हर्षितने सामन्यात पुनरागमन केले आणि निर्णायक गेममध्ये एकतर्फी विजय नोंदवला.

विजय मर्चंट ट्रॉफी स्पर्धा

महाडच्या आरुष कोळेचे नाबाद द्विशतक

| महाड | प्रतिनिधी |

महाडच्या क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानास्पद आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. महाड येथील एसबीसी क्रिकेट अकॅडमीचा युवा आणि प्रतिभावान क्रिकेटपटू आरुष सचिन कोळे याने बीसीसीआयच्या वतीने आयोजित २०२६-२७ च्या विजय मर्चंट ट्रॉफी स्पर्धेत आपल्या फलंदाजीचा दमदार ठसा उमटवला आहे. मुंबईच्या १६ वर्षांखालील संघाकडून खेळताना तामिळनाडू विरुद्ध त्याने तब्बल नाबाद २०१ धावांची शानदार द्विशतकी खेळी साकारली. ३३३ चेंडूंचा सामना करत त्याने मिळवलेले हे यश महाडसह संपूर्ण रायगड जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरले आहे.

ग्वाल्हेर येथील श्रीमंत माधवराव सिंधिया स्टेडियमवर सुरू असलेल्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत आरुषने फलंदाजीतील संयम, तांत्रिक कौशल्य आणि खेळातील परिपक्वता दाखवून दिली. प्रदीर्घ वेळ मैदानावर टिकून राहत प्रतिस्पर्धी गोलंदाजांचा सामना करत त्याने द्विशतक पूर्ण केले. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे क्रिकेटप्रेमी आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांकडून त्याचे विशेष कौतुक होत आहे.



आरुष हा महाडच्या एसबीसी क्रिकेट अकॅडमीचा नियमित खेळाडू असून, अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक आवेश अय्युब चिचकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने क्रिकेटचे धडे गिरवले आहेत. सातत्यपूर्ण सराव, कठोर मेहनत, शिस्त आणि खेळाप्रती असलेली निष्ठा यामुळेच आरुषने हे यश संपादन केल्याचे प्रशिक्षकांनी सांगितले. त्याच्या या कामगिरीबद्दल त्यांनी विशेष अभिनंदन करत भविष्यात भारतीय क्रिकेटमध्येही त्याने आपली वेगळी ओळख निर्माण करावी, अशा शुभेच्छा दिल्या.

आरुष हा महाडमधील वैद्यकीय क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व डॉ. सचिन सुधाकर कोळे आणि डॉ. पूनम सचिन कोळे यांचा सुपुत्र आहे. त्याच्या या यशामुळे कुटुंबीयांसह मित्रपरिवार आणि महाडकरांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.एसबीसी क्रिकेट अकॅडमीचे अध्यक्ष बशीर चिचकर, ॲड. दत्ता वाडकर, ॲड. पंकज पंडित, रमेश पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी आरुषचे अभिनंदन केले आहे. महाडच्या मातीतून घडलेला आरुष कोळे आज राष्ट्रीय स्तरावर आपल्या फलंदाजीच्या जोरावर लक्ष वेधून घेत आहे. त्याच्या या ऐतिहासिक द्विशतकी खेळीने महाडच्या क्रिकेट विश्वात नवा उत्साह निर्माण केला असून, भविष्यात तो भारतीय क्रिकेटमध्ये मोठे नाव कमावेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सावंतवाडीच्या भरत सावंतचा कॅरममध्ये डंका!

प्रल्हाद नलावडे स्मृती चषकावर कोरले नाव

| मुंबई | प्रतिनिधी |

कांदिवली येथे आयोजित करण्यात आलेल्या कॅरमप्रेमी प्रल्हाद नलावडे स्मृती शालेय कॅरम स्पर्धेत सावंतवाडीच्या भरत सावंतने विजेतेपद पटकावले. आरपीडी हायस्कूल-सावंतवाडीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भरतने अंतिम सामन्यात पोद्दार अकॅडमी-मालाडच्या द्वितीय मानांकित प्रसन्न गोळेचा ११-१० असा पराभव करत अजिंक्यपदावर नाव कोरले.

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी, शशिकलाई फाउंडेशन आणि अविनाश नलावडे स्पोर्ट्स यांच्या संयुक्त विद्यमाने बालदिनानिमित्त या स्पर्धेचे आयोजन करण्यात



आले होते. सिनको चॅम्पियन कॅरम बोर्डवर रंगलेल्या या स्पर्धेत विविध जिल्ह्यांतील ६८ शालेय खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेच्या अंतिम फेरीपर्यंत प्रसन्न गोळेने प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करत दर्जेदार खेळाचे प्रदर्शन केले. मात्र, अंतिम सामन्यात भरत सावंतने त्याला कडवी झुंज दिली. निर्णायक बोर्डापूर्वी ११-७ अशी आघाडी असतानाही प्रसन्नला विजेतेपद मिळवता आले नाही. भरतने ११-१० असा विजय मिळवत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

शालेय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धा

राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ निश्चित

| मुंबई | प्रतिनिधी |

एसबीआय लाइफ महाराष्ट्र राज्य शालेय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात वीर धवल शाह आणि एआयएम हृदय मनियार यांनी सातही डाव जिंकत आपापल्या गटांमध्ये निर्विवाद वर्चस्व गाजवले. दहिसर (पश्चिम) येथील रुस्तमजी केंब्रिज इंटरनॅशनल स्कूलमध्ये झालेल्या स्पर्धेत उर्वरित गटात लावण्या सिंग, विहान अग्रवाल, तिस्या पट्ट आणि दृश्या नाईक यांनी विजेतेपद पटकावले.

इंडियन चेस स्कूलच्या आयोजनाखाली झालेल्या या स्पर्धेत ९, १३ आणि १७ वर्षांखालील मुले व मुली अशा सहा फिडे मानांकित गटांतून एकूण ३८७ खेळाडूंनी सहभाग घेतला. एसबीआय लाइफ स्पर्धेचे मुख्य प्रायोजक, तर रुस्तमजी केंब्रिज इंटरनॅशनल स्कूल यजमान होते. वीर शाहने ९ वर्षांखालील खुल्या गटात सातही डाव जिंकत सात गुणांसह विजेतेपदावर नाव कोरले. तर १७ वर्षांखालील खुल्या गटात अग्रमानांकित हृदय मनियारनेही सात पैकी सात गुणांची कमाई करत अजिंक्यपदाला गवसणी घातली. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभ एसबीआय लाइफचे विभागीय संचालक राजीव श्रीवास्तव आणि प्रादेशिक व्यवस्थापक अतुल मेहता यांच्या हस्ते पार पडला. त्यांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना चषक व पदके प्रदान करण्यात आली. स्पर्धेसाठी एकूण ६० हजार रुपयांची पारितोषिक रक्कम ठेवण्यात आली होती.प्रत्येक गटासाठी १० हजार रुपयांचे पारितोषिक निश्चित करण्यात आले होते. प्रत्येक गटातील पहिल्या तीन खेळाडूंना चषक, तर चौथ्या ते दहाव्या क्रमांकावरील खेळाडूंना पदक देऊन गौरविण्यात आले.

९ वर्षांखालील खुल्या गटात वीर शाह (१५०१) याने सातही डाव जिंकत सात गुणांसह अव्वल स्थान मिळवले. पहिल्या टप्प्यात ७ वर्षांखालील खुल्या गटाचे विजेतेपद मिळवणाऱ्या इवान दुबेने सहा गुणांसह दुसरा, तर जमनाबाई नरसी स्कूलच्याच आरव रवी झावरने सहा गुणांसह तिसरा क्रमांक मिळवला.

सिम्बायोसिस प्रायमरी अँड सेकंडरी स्कूलचा एएफएम अद्विक नवल ५.५ गुणांसह चौथ्या स्थानावर राहिला. पोदार इंटरनॅशनल स्कूलचा ईशान अग्निहोत्री पाचवा, विश्वज्योत हायस्कूलचा आरव देशमुख सहावा, व्हिबग्योर राइज (मालाड) चा एसीएम अगस्त्य पटवा सातवा आणि न्यू होरायझन स्कॉलर्स स्कूलचा अर्णव वाघमारे आठव्या स्थानावर राहिले. या सर्वांनी ५.५ गुण मिळवले. आयुष तिवारीने पाच गुणांसह नववे, तर शिवाशिष कवितीने पाच गुणांसह दहावे स्थान मिळवले.

मुलींच्या ९ वर्षांखालील गटात संजीवनी इंटरनॅशनल स्कूलच्या लावण्या सिंगने सहा गुण मिळवत सरस टायब्रेकच्या आधारे विजेतेपद पटकावले. जे. बी. पेटिट हायस्कूल फॉर गर्ल्सच्या इशी सिंगने सहा गुणांसह दुसरा, तर निकिता संदीपने सहा गुणांसह तिसरा क्रमांक मिळवला. कनिष्का गाला ५.५ गुणांसह चौथी, तर लिया कृष्णन ५.५ गुणांसह पाचव्या स्थानावर राहिली. मिराई सरदाना आणि मानसी दानू यांनी प्रत्येकी पाच गुणांसह अनुक्रमे सहावा व सातवा क्रमांक मिळवला.

सामन्यांच्या वेळापत्रकात कोणताच बदल नाही | १४ जानेवारीपासून स्पर्धेला सुरुवात

ब्रेबोर्नऐवजी वानखेडेवर रंगणार मुंबईतील सर्व सामने

| मुंबई | प्रतिनिधी |

विमेंस प्रीमियर लीगच्या सामन्यांच्या स्थळात महत्त्वाचा बदल केला आहे. मुंबईत होणारे सर्व सामने आता ब्रेबोर्न स्टेडियम ऐवजी वानखेडे स्टेडियमवर खेळवण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे, सामन्यांच्या तारखा आणि वेळापत्रकात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. या निर्णयामुळे प्रथमच वानखेडे स्टेडियमला सामन्यांचे यजमानपद मिळणार आहे.

बीसीसीआयने रविवारी (दि.१५) यासंदर्भात माहिती दिली. यापूर्वी मुंबईतील सर्व सामने ब्रेबोर्न स्टेडियमवर होणार होते. मात्र, आयसीसीच्या आगामी महिला चॅम्पियन्स ट्रॉफीमुळे मैदानाच्या उपलब्धतेचा आणि खेळपट्टीच्या तयारीचा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे मुंबईतील सामन्यांचे ठिकाण बदलण्याचा निर्णय घेण्यात आला.

१४ ते २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत ब्रेबोर्न स्टेडियम



आणि वडोदरा इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडियमवर पहिल्या आयसीसी महिला चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेत सहा संघ सहभागी होणार आहेत. संपल्यानंतरलगेचचही आंतरराष्ट्रीय स्पर्धा सुरू होणार असल्याने ब्रेबोर्न स्टेडियमवरील खेळपट्टीला पुन्हा तयार करण्यासाठी पुरेसा वेळ मिळणार नाही. आयसीसीच्या नियमानुसार स्पर्धा सुरू होण्याच्या १५ दिवस आधी संबंधित मैदानाचा पूर्ण ताबा आयसीसीकडे असणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर आयसीसीने ब्रेबोर्न स्टेडियमवरील सामने अन्यत्र हलवण्याची विनंती केली होती. त्यानंतर समितीने या बदलाला मंजुरी दिली. मुंबई टप्प्यातील एकूण ११ सामने आता वानखेडे स्टेडियमवर खेळवले जातील. यामध्ये साखळी फेरीतील १२व्या ते २०व्या सामन्यांसह एलिमिनेटर आणि अंतिम सामन्याचा समावेश आहे. हे सामने २६ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत होणार आहेत. नव्या हंगामाला १४ जानेवारीपासून वडोदरा येथे सुरुवात होणार आहे. पहिल्या सामन्यात गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सामना दोन वेळच्या विजेत्या मुंबई इंडियन्सशी होईल. २४ जानेवारीपर्यंत वडोदरा येथे पहिले ११ सामने खेळवले जातील.

इंग्लंडने ऑस्ट्रेलियाला १३५ धावांनी हरवले

| ॲडलेड | वृत्तसंस्था |

इंग्लंडने ऑस्ट्रेलियाचा दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात १३५ धावांनी पराभव केला. यासोबतच ३ सामन्यांची मालिका १-१ अशी बरोबरीत आली.

इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ६ गडी गमावून ३५५ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर इंग्लंडची ही सर्वात मोठी एकदिवसीय धावसंख्या आहे. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाचा संघ २२० धावांवर सर्वबाद झाला.इंग्लंडकडून टॉम बँटनने १२१ धावांची खेळी केली. जो रूटने ६२, तर जॉर्डन कॉक्सने ६७ धावा केल्या. विल जॅक्स ५४ धावांवर नाबाद राहिला. त्यानंतर गोलंदाजीत गस ॲटकिन्सनने २८ धावा देत ४ बळी घेतले.

टॉम बँटनने वनडे कारकिर्दीतील दुसरे शतक झळकावले. डावाच्या सहाव्या षटकात स्पेन्सर जॉन्सनचा वेगवान बाऊन्सर त्यांच्या हेल्मेटवर आदळला. चेंडू इतक्या वेगाने आला की हेल्मेटचा नेक गार्ड निघून गेला आणि त्यांच्या गालावर दुखापतीची खूणही उमटली. मात्र, बँटनने फलंदाजी सुरूच ठेवली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)